बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक ३६ | बुधवार, दि.१२ ते १८ ऑगस्ट २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## जपतलाईतील तीन विद्यार्थिनींच्या मृत्यूने संतापाची लाट : सुविधांचा प्रश्न




**गडचिरोली:-** धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील कुप्पा लिंगो अनुदानित आदिवासी आश्रम शाळेत तीन विद्यार्थिनींचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याच्या घटनेने सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. प्रशासकीय उदासीनता व संस्था व्यवस्थापनाचा निष्काळजीपणा निष्पाप विद्यार्थिनींच्या जीवावर बेतला. धक्कादायक म्हणजे, या आश्रमशाळेत मुला मुलींसाठी स्वतंत्र निवासी वसतिगृह आहे, पण तेथे सुविधांची वाणवा असून तब्बल ७९ विद्यार्थिनींना एकाच खोलीत कोंडवाड्यासारखे जमिनीवर झोपवले जात होते, अशी माहिती पुढे आली आहे.

माजी खासदार मोरातराव कोवासे है अध्यक्ष असलेल्या कुप्पा लिंगो शैक्षणिक व संस्कृती विकास संशोधन संस्थेची जपतलाई येथे अनुदानित आश्रम शाळा आहे. तेथे पहिली ते दहावीपर्यंतच्या शिक्षण व निवासाची सोय आहे. वसतिगृहात एकाच खोलीत झोपलेल्या ७९ पैकी सहा मुलींना सर्पदंश झाला, यापैकी तिघींचा दुर्दैवाने मृत्यू झाला तर अन्य तिघींवर उपचार सुरु आहेत.

यासोबतच इतर १२ मुली या घटनेने भयभीत झाल्या असून त्यांना सर्पदंश नाही, पण उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे. या वसतिगृहात गोरगरीब आदिवासी कुटुंबातील मुली शिक्षण घेत असून तेथे सीसीटीव्हीची सुरक्षा व्यवस्थाही नसल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, या घटनेनंतर आमदार डॉ. मिलिंद नरोटे हे मुंबई दौरा रद्द करून तातडीने नागपूरहून गडचिरोलीला परतले. डॉ. नरोटे यांच्यासह माजी खासदार अशोक नेते, माजी आमदार डॉ. नामदेव उसेंडी, माजी आमदार डॉ. देवराव होळी यांनी जपतलाई आश्रमशाळा व जिल्हा रुग्णालयात भेट दिली.

### लाडकी सुष्मिता होती अभ्यासात हुशार !

**मोठी मुलगी काजल हिने याच आश्रमशाळेतून दहावी उत्तीर्ण केली असून सध्या ती अकरावीत शिक्षण घेत आहे. दुसरी बहीण प्रियंका दहावीत, सुष्मिता आठवीत, तर सर्वांत लहान किरण पाचवीत शिकत आहे. चारही बहिणी एकमेकींची काळजी घेत, एकमेकींच्या सुख-दुःखात सहभागी होत शिक्षणाचा प्रवास करीत होत्या.सुष्मिता अभ्यासात हुशार होती. चाचणी परीक्षांमध्ये ती सातत्याने चांगले गुण मिळवत असे. सर्व विषयांची आवड असली तरी इंग्रजी विषयावर तिचे विशेष प्रेम होते. शिकून मोठे होण्याची तिची स्वप्ने होती; मात्र ती अधुरीच राहिली.**

### 'अनु'च्या कुटुंबाचा टाहो

**अवघ्या दुसऱ्या वर्गात शिकणाऱ्या अनु कोरेटी हिच्या आई-वडिलांनी एकच आक्रोश केला. अभ्यासात हुशार असलेले चिमुरडी काळाने हिरावून घेतल्याने संपूर्ण कुटुंबियाला मोठा धक्का बसला होता.**



### मृत विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांना ५ लाखांची मदत

**जपतलाई येथील अनुदानित आश्रमशाळेला सहपालकमंत्री ॲड, आशिष जयस्वाल यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला, शिवाय मृतांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी मृत दीपिका लकडा, सुष्मिता मंडल व अनु कोरेटी या विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली. त्यापैकी प्रत्येकी १ लाख रुपयांची तात्काळ मदत सुपूर्द केली आहे. याशिवाय मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी अतिरिक्त ५ लाख रुपयांची ३ मदतीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. यावेळी आमदार डॉ. मिलिंद नरोटे, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, आदिवासी विकास विभागाच्या अपर आयुक्त आयुषी सिंह व जिल्हा पोलिस अधीक्षक एम. रमेश उपस्थित होते.**

### दीपिका होती लहान बहिणींची आधारवड

**या घटनेत मृत्युमुखी पडलेली दीपिका ऐतवा लकड़ा ही सहावीत शिकत होती. ती एटापल्लीच्या जवेली गावची रहिवासी होती. तिचे वडील शेती करतात. दीपिकाच्या चारही बहिणी याच आश्रमशाळेत शिकत होत्या. दीपिका आपल्या लहान बहिणींची विशेष काळजी घ्यायची. आठ दिवसांपूर्वी लहान बहिणीला ताप आला होता. तिच्या उपचारासाठी तिने वडिलांकडे फोन करून पैसे मागितले होते. शिक्षकाच्या मोबाइलवर वडिलांनी पैसे पाठविल्याची माहिती तिच्या आईने दिली.**

## १४७ कोटींच्या रस्त्याच्या कामात नियोजनाचा बोजवारा?

### रस्ता रुंद करण्याऐवजी अरुंद करण्याच्या घाट ? एमआयडीसीच्या नाली बांधकामावर नागरिकांचा संताप

**अर्जुनी मोरगाव :** -तब्बल १४७ कोटी रुपयांचा निधी खर्च करून अर्जुनी मोरगाव शहरातील रस्ता व नाली बांधकाम महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत (MSIDC) सुरू आहे. बिरसा मुंडा चौक ते शहराच्या मध्यवर्ती भागातून होत असलेल्या या रस्त्याच्या कामात नाली बांधकामाच्या नियोजनावरून नागरिकांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.



सदर रस्त्याचे स्वरूप ७ मीटर रस्ता, दोन्ही बाजूंना प्रत्येकी १ मीटरची नाली आणि रस्ता व नालीच्या मधोमध १.५ मीटरचा शोल्डर असे असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, ग्रामपंचायत काळापासून अस्तित्वात असलेल्या नालीचा विचार न करता रस्त्याच्या लगत नवीन नालीचे बांधकाम करण्यात येत असल्याने भविष्यातील रस्ते रुंदीकरणाला यामुळे अडथळा निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**१४७ कोटींचा खर्च, पण भविष्यातील नियोजन कुठे?**

शहराची वाढती लोकसंख्या आणि वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता भविष्यात या रस्त्याची रुंदी वाढविण्याची गरज निर्माण होणार आहे. शासनाकडून शहरातील प्रमुख रस्ते रुंद करण्याचे धोरण राबविले जात असताना, आजच रस्त्यालगत नाली आणि शोल्डरचे बांधकाम करून भविष्यातील रुंदीकरणासाठी उपलब्ध जागा कमी केली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

१४७ कोटी रुपये खर्च करून तयार होणारा रस्ता भविष्यात रुंद करायचा असेल, तर त्यासाठी आवश्यक जागेचे नियोजन आजच का केले जात नाही? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

जर भविष्यात रस्ता रुंदीकरण करताना सध्याची नाली अथवा इतर बांधकामे हटवावी लागली, तर पुन्हा मोठ्या प्रमाणात शासकीय निधी खर्च होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आजच दूरदृष्टीने नियोजन करून सार्वजनिक निधीचा संभाव्य अपव्यय टाळावा, अशी मागणीहोत आहे.

**रस्ते रुंद करण्याचे धोरण की रस्ते अरुंद करण्याचा प्रयोग?**

एकीकडे शासन भविष्यातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून रस्ते रुंदीकरणाचा अभियान राबवत आहे, तर दुसरीकडे एमएसआयडीसी शासनाच्या अभियानाला हरताळ फासत असल्याचा अनुभव येत आहे .नागरिकांच्या म्हणण्यानुसार, एवढ्या मोठ्या निधीतून होणाऱ्या कामात केवळ आजची गरज न पाहता पुढील अनेक वर्षांचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे कामाचा मंजूर आराखडा, रस्त्याची अंतिम रुंदी, नालीची जागा, शोल्डरची रचना आणि भविष्यातील रुंदीकरणाचे नियोजन याबाबत संबंधित विभागाने पारदर्शकता दाखवावी.

**कार्यकारी अभियंता ऋतुजा वंजारी नॉट रिचेबल?**

या संदर्भात कार्यकारी अभियंता ऋतुजा वंजारी यांच्याशी संपर्क साधून रस्त्याचे नियोजन, नालीची जागा आणि भविष्यातील रस्ते रुंदीकरणाबाबत विभागाची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.दरम्यान, ?१४७ कोटींच्या निधीतून होणाऱ्या या महत्त्वाकांक्षी रस्ते प्रकल्पाचे काम भविष्यातील गरजा लक्षात घेऊनच करण्यात आले आहे का? याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने तांत्रिक तपासणी करण्याची मागणी जोर धरत आहे.

बिरसा मुंडा चौकात रेल्वे और ब्रिजचा उतार आहे.नेमका याच ठिकाणी रस्ता अरुंद होणार आहे.यामुळे मोट्या दुर्घटना होऊन जीवित हानी होण्याच्या शंका बळावल्या आहेत. विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च करून उद्या पुन्हा तोच रस्ता व नाली तोडण्याची वेळ येणार आहे. एकाच कामासाठी शासनाच्या निधीचा वारंवार वापर होणे उचित आहे का? सदर नाली बांधकाम तात्काळ थांबवून जुन्या नालीवरून बांधकाम व्हावे याकरिता शहरातील नागरिकांनी नगरपंचायत ला निवेदन सादर केले.

दरम्यान नगरसेवक राधेश्याम भेंडारकर, मुख्याधिकारी ज्ञानेश सोनवाणे,सामाजिक कार्यकर्ते महादेव सलामे,पुनाराम जगझापे,बाळू नेवारे, मंगेश भलावी,सुधीर राऊत,नरेश गोंडाने, जगदीश मेश्राम यांनी पुढील तोडगा निघेपर्यंत प्रकल्प अधिकारी भुरे यांना काम बंद करण्यास भाग पाडले.

## १० वर्षांपासून जिल्ह्यातच, तरीही पौनीकरांना गोंदियाचा मोह सुटेना !

**गोंदिया:-** महिला व बालविकास विभागात एक अजब आणि धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने शासनाला पूर्णपणे अंधारात ठेवत,नोकरीचा सर्वाधिक काळ गोंदिया जिल्ह्यांत घालवल्याचे समोर आले आहे.विशेष म्हणजे गोंदियावरुन बदली झाल्यानंतर सदर अधिकारी हे इतर भंडारा वगळता इतर ठिकाणी रूजू होण्यास करीत असलेली टाळाटाळीमागचे कारण काय अशा प्रश्न उपस्थित झालेला आहे.विशेष सध्या गोंदिया जिल्हा महिला बाल विकास विभागाचा हिरकणी कक्ष घोटाळा गाजत असून आता त्यांच्या गोंदिया जिल्ह्यातील सर्वाधिक १० वर्षाच्या नोकरी काळातील खरेदी व इतर आर्थिक व्यवहाराची चौकशी गरजेचे झाल्याचे समोर येऊ लागले आहे.

प्रशासकीय कारकिर्दीचा आलेखसंबंधित अधिकाऱ्याने महिला वबालविकास विभागात 'परिविक्षा अधिकारी'(Probation Officer) म्हणून आपल्या प्रशासकीय सेवेला सुरुवात केली होती. या काळात बाल न्याय कायद्यांतर्गत विधीसंघर्षग्रस्त आणि गरजूबालकांच्या पुनर्वसनाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. त्यानंतर २०१६ ते २०१७ दरम्यान गोंदिया जिल्ह्यातील देवरी या आदिवासी बहुल तालुक्यात 'बाल विकास प्रकल्प अधिकारी' (CDPO) (वर्ग २) म्हणून काम पाहिले. पुढे २०१७ ते२०२१ दरम्यान त्यांनी गोंदिया जिल्ह्याचे 'जिल्हा महिला व बालविकास अधिकारी (वर्ग २)'(DWCDO) पद भूषवले. त्यानंतर २०२२ ते २०२४ याकाळात भंडारा येथे याच पदावर आणि एकात्मिक बाल विकास सेवायोजना अंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी(नागरी) वर्ग१ सेवेत ते कार्यरत होते.

**वर्ग दोनच्या अधिका-याने साभाळले दोन्ही जिल्ह्यात वर्ग एक चा कार्यभार !**

गोंदिया जिल्ह्यात कर्तव्यावर असताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी(बाल कल्याण) जिल्हा परिषद वर्ग १ व काही काळ बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) वर्ग १ या पदावर अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता.तसेच भंडारा जिल्ह्यात कर्तव्यावर असताना बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) वर्ग १ चा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. या अधिकाऱ्यांच्या कर्त्तव्य कालावधीत या दोन्ही जिल्ह्यात वर्ग एक चे एकही सक्षम अधिकारी नव्हते काय?अशा प्रश्न उपस्थित झाला असून विभागीय आयुक्त कार्यालय स्तरावर किवा मंत्रालय स्तरावर कोणीतरी वरिष्ठ अधिका-यांचे सूत जुळले असल्याचे यावरुन उघड होते.

**बदली धारणीला, पण थेट गोंदियात एंट्री!**

भंडारा येथील कार्यकाळ संपल्यानंतर शासनाने त्यांची बदली अमरावती जिल्ह्यातील धारणी येथे केली होती. मात्र, शासनाच्या या आदेशाला केराची टोपली दाखवत धारणी येथे रुजूच झाले नाहीत. बदली विरोधात ते न्यायालयात गेले. न्यायालयातप्रकरण न्यायप्रविष्ट असतानाच,मार्च २०२६ मध्ये गोंदिया जल्ह्यात पुन्हा पदभार पद पदरात पाडून घेतला. प्रशासकीय वतुर्ळात तीव्र खळबळ एकीकडे धारणी येथील नियुक्तीचे कायदेशीर प्रकरण प्रलंबित असताना, दुसरीकडे गोंदियात रुजू होऊन दोन जिल्ह्यांचा खेळ खंडोबा मांडणाऱ्या या अधिकाऱ्याच्या कर्तुत्वाची संपूर्ण महिला व बालविकास विभागात चर्चा आहे. शासनाची दिशाभूल करून नागपूर विभागाबाहेरील इतर जिल्ह्या जाण्यास टाळाटाळ करुन नियमांना हरताळ फासून सेवा बजावणाऱ्या या अधिकाऱ्याला गोंदिया जिल्ह्यातून इतर जिल्ह्यात पाठवण्याची हिंमत महिला व बाल विकास विभागाच्या सचिवात आहे की नांगी टाकतात हे बघायचे आहे.

## बँकींग कायद्यात वेळेनुसार बदल करणे तेवढेच गरजेचे-राजेंद्र जैन

### बँकर विधेयकाला राष्ट्रवादी काँग्रेसचा पाठींबा

**गोंदिया :-** राज्यसभेत मबँकर वही साक्ष विधेयक २०२६फ वर झालेल्या चर्चेदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने खा. राजेंद्र जैन यांनी या विधेयकाला पूर्ण पाठिंबा दर्शवला आहे. कायद्यात वेळेनुसार



बदल करणे गरजेचे असून १८८१ चा जुना कायदा आजच्या डिजिटल भारताच्या आणि आधुनिक बँकिंग व्यवस्थेच्या गरजा पूर्ण करू शकत नाही, असे मत सोमवारी (दि. १०) सभागृहात या विधेयकावर बोलताना व्यक्त केले. खा. राजेंद्र जैन यांनी सांगितले की १८८१ मध्ये जेव्हा मूळ कायदा बनवला गेला होता, तेव्हा संगणक, इंटरनेट, मोबाइल बँकिंग किंवा डिजिटल स्वाक्षरी यांसारख्या आधुनिक सुविधा उपलब्ध नव्हत्या. परंतु आज भारत जगात यूपीआयद्वारे होणाऱ्या रिअल-टाइम डिजिटल व्यवहारांमध्ये आघाडीवर आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात २२१.६७ अब्जाहून अधिक किरकोळ डिजिटल व्यवहारांमध्ये यूपीआयचा वाटा ८१ टक्के राहिला आहे.

ही देशासाठी अत्यंत भूषणावह बाब आहे. या नव्या विधेयकामुळे न्यायालयीन प्रक्रियेत सुलभता येईल आणि बँकेच्या अधिकाऱ्यांना वारंवार न्यायालयात फेऱ्या माराव्या लागणार नाहीत. यामुळे बँक कर्मचारी आणि ग्राहक दोघांचाही महत्त्वाचा वेळ वाचेल. वाचलेल्या वेळेचा उपयोग मुद्रा लोन, पीएम एम्प्लॉयमेंट गॅरंटी आणि कृषी पायाभूत सुविधा यांसारख्या शासकीय योजना अधिक गतीने राबवण्यासाठी होईल. ग्रामीण भागातील सहकारी बँकांच्या आधुनिकीकरणावर बळकटीकरणावर त्यांनी भर दिला. हे विधेयक केवळ बँक नोंदींपुरते मर्यादित नसून डिजिटल भारत, पारदर्शक न्यायव्यवस्था व आधुनिक आर्थिक यंत्रणेला बळ देणारे पाऊल असल्याचे सांगत त्यांनी हे विधेयक सभागृहाने एकमुखाने मंजूर करावे असे मत व्यक्त केले.

## तलावात आंघोळीसाठी गेलेल्या २२ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू

### गोरेगाव तालुक्यातील मुंडीपार येथील घटना



**गोरेगाव:-**तालुक्यातील मौजा मुंडीपार येथे तलावात आंघोळीसाठी गेलेल्या एका २२ वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पुनीत किशोर गमधरे (वय अंदाजे २२ वर्षे, रा. मुंडीपार) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काल सोमवारी (दिनांक १० ऑगस्ट २०२६) सायंकाळी ५ ते ६ च्या सुमारास पुनीत हा आपल्या ३ ते ४ मित्रांसोबत गावाजवळील तलावामध्ये आंघोळीसाठी गेला होता. आंघोळ करत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने पुनीत अचानक खोल पाण्यात बुडू लागला. सोबत असलेल्या मित्रांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना अपयश आले.

या घटनेची माहिती तत्काळ गावकरी आणि पोलिसांना देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन शोधमोहीम राबवली आणि पुनीतला पाण्याबाहेर काढले, परंतु उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता.

एन ऐनवेळी झालेल्या या दुर्दैवी घटनेमुळे मुंडीपार गावावर आणि गमधरे कुटुंबावर शोककळा पसरली आहे. या प्रकरणाची गोरेगाव पोलिसांत नोंद करण्यात आली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## तुमसर शासकीय उपजिल्हा रुग्णालयात निकृष्ट आहार आणि अस्वच्छतेचा कारभार

**तुमसर:-** तुमसर येथील सुभाषचंद्र बोस शासकीय उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या सर्वसामान्य रुग्णांची मोठ्या प्रमाणावर हेळसांड होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. रुग्णांना दिला जाणारा निकृष्ट दर्जाचा आहार, सर्वत्र पसरलेली अस्वच्छता आणि प्रशासकीय निष्काळजीपणामुळे रुग्णांच्या आरोग्याशी थेट खेळ सुरू आहे. या अव्यवस्थेविरोधात स्वराज्य युवा एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अमित मेश्राम यांनी आक्रमक भूमिका घेत रुग्णालय प्रशासनाला अल्टिमेटम दिला आहे. जर आहारात सुधारणा न झाल्यास रुग्णालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा वैद्यकीय अधिक्षक डॉ. नितीन मिसुरकर यांना निवेदनाद्वारे करण्यात आला आहे.

**शासकीय मेन्यू कागदावरच; रुग्णांना अंडी नाकारली**

शासकीय नियमांनुसार रुग्णालयात शस्त्रक्रिया झालेल्या आणि गंभीर रुग्णांना वैद्यकीय गरजेनुसार उच्च प्रथिनयुक्त आहार म्हणून उकडलेली अंडी देणे बंधनकारक आहे. मात्र, संबंधित कंत्राटदाराकडून शासनाचा अधिकृत मेन्यू धाब्यावर बसवला जात असून रुग्णांना अंडी दिली जात नाहीत. तसेच पुरवला जाणारा आहार अत्यंत निकृष्ट व खाण्यायोग्य नसून, रुग्णांना नाईलाजाने उपाशी राहावे लागत असल्याचे विदारक चित्र आहे.

**तपासणी अधिकारी गायब; परिचारिकेवर प्रभारी भार**

नियमानुसार रुग्णांना आहार वितरीत करण्यापूर्वी जबाबदार अधिकाऱ्याने त्याची गुणवत्ता तपासणे आवश्यक असते. परंतु, गेल्या सहा महिन्यांपासून रुग्णालयात अधिकृत तपासणी अधिकारीच उपलब्ध नाही. प्रशासनाने या अत्यंत महत्त्वाच्या जबाबदारीचा भार एका परिचारिकेवर (नर्स) सोपवून स्वतःची सुटका करून घेतली आहे.

**स्वच्छतेचा फज्जा; संसर्गाची भीती**

रुग्णालयात दिवसातून तीन वेळा स्वच्छता आणि स्वच्छतागृहांची निर्जंतुकीकरण करणे गरजेचे असताना, केवळ दोनदाच वरवरची स्वच्छता केली जाते. निकृष्ट दर्जाच्या फिनाईलचा वापर होत असल्याने रुग्णालयातच संसर्ग (इन्फेक्शन) पसरण्याची गंभीर भीती व्यक्त होत आहे. स्थानिक प्रशासन, वैद्यकीय अधीक्षक व लोकप्रतिनिधी या गंभीर बाबींकडे दुर्लक्ष करत संबंधित कंत्राटदाराला पाठीशी घालत असल्याचा आरोप नागरिक व रुग्णांकडून केला जात आहे.

या संपूर्ण प्रकाराबाबत भंडारा जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक आणि तुमसर वैद्यकीय अधीक्षक यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव, आरोग्य उपसंचालक (नागपूर) व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना निवेदने पाठवण्यात आली आहेत. पुढील ७ दिवसांत कठोर कारवाई न झाल्यास तीव्र जनआंदोलन उभारले जाईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते अमित मेश्राम , जिल्हा सोशल मीडिया प्रमुख बालचंद बोन्द्रे, आरोग्य समितीचे परमानंद कटरे, सलमान पठाण, कैलास बिसने, प्रज्वल देशभ्रतार, सुशांत नागदेवे, नरेंद्र साटके, विक्की पांडेय व राजकुमार नैताम यांनी दिला आहे.

स्वच्छता व आहाराबाबत तक्रार प्राप्त झाली असून आहार पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराला तात्काळ नोटीस बजावण्यात येत आहे. रुग्णांना दर्जेदार आहार देणे कंत्राटदारावर बंधनकारक असून, तपासणीत त्रुटी आढळल्यास नियमानुसार कडक कारवाई केली जाईल.

**- डॉ. नितीन मिसुरकर,** वैद्यकीय अधीक्षक, शासकीय उपजिल्हा रुग्णालय, तुमसर.

शासकीय उपजिल्हा रुग्णालयात गोरगरीब रुग्णांना निकृष्ट दर्जाचे जेवण देणे आणि आरोग्याशी खेळणे अत्यंत गंभीर बाब आहे. शासनाचा अधिकृत मेन्यू धाब्यावर बसवून कंत्राटदार रुग्णांची हेळसांड करत आहे आणि रुग्णालय प्रशासन याकडे डोळेझाक करत आहे.

**-अमित मेश्राम,** संस्थापक अध्यक्ष, स्वराज्य युवा एकता फाउंडेशन तुमसर, जिल्हा भंडारा.

माझी शस्त्रक्रिया झाली असून मी शुक्रवारपासून रुग्णालयात उपचार घेत आहे. परंतु, आहार देणाऱ्यांनी आजपर्यंत एकदाही उकडलेली अंडी दिली नाहीत. निकृष्ट दर्जाची भाजी आणि खाण्यायोग्य नसलेले अन्न दिल्याने आम्हाला उपाशी राहावे लागले. आता नाईलाजाने घरूनच जेवणाचा डब्बा मागवावा लागत आहे.

**- द्वारकाप्रसाद हातझाडे,** शस्त्रक्रिया झालेले रुग्ण, परसवाडा

## मंडल यात्रेतून ओबीसींचा एल्गार; जनगणनेशिवाय आता माघार नाही

### चंद्रपुरात समारोप : विजय वडेट्टीवारांनी केले ओबीसी हक्कांसाठी एकजूट होण्याचे आवाहन






**चंद्रपूर :-** ओबीसींच्या हक्कांसाठी जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे. त्यासाठी आता स्वस्थ बसायचे नाही, असा निर्धार विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला. ओबीसींची चळवळ थांबली होती, तेव्हा आपण ती पुन्हा सुरू केली. जालन्यात दोन लाखांचा मोर्चा काढला आणि त्यानंतर इतरही लोक या लढ्यात सहभागी झाले, असा दावा त्यांनी केला.

ओबीसींच्या जातनिहाय जनगणनेसह आरक्षण आणि सामाजिक न्यायाच्या मागण्यांसाठी भंडारा येथून निघालेली मंडल यात्रा रविवारी चंद्रपुरात दाखल झाली. जिल्ह्यासह चंद्रपूर शहरात विविध ठिकाणी यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. त्यानंतर प्रियदर्शिनी सभागृहात झालेल्या समारोपीय कार्यक्रमात वडेट्टीवार बोलत होते. या यात्रेचे आयोजन जातनिहाय जनगणना, मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी आणि ओबीसींच्या घटनात्मक हक्कांसाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने करण्यात आले होते.मंडल आयोगामुळे ओबीसींना २७टक्के आरक्षण मिळाल्याचा उल्लेख करत वडेट्टीवार यांनी देशाच्या संपत्ती आणि अधिकारांमध्ये बहुजन, एससी, एसटी आणि ओबीसी समाजाच्या हक्कांचा मुद्दा उपस्थित केला.

समाजाच्या हक्कांसाठी एकजूट होण्याचे आवाहन त्यांनी केले.यावेळी पदवीधर शिक्षक आमदार अभिजित वंजारी, मंडल यात्रा संयोजक उमेश कोर्राम, काँग्रेस अनुसूचित जाती सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ. अनिरुद्ध वनकर, विनायक बांगडे, अनिल डहाके, ॲड. विलास माथनकर, विजय टोंगे, उपमहापौर प्रशांत दानव, नंदू नगरकर, ॲड. पुरुषोत्तम सातपुते, बाळू खोब्रागडे, दीप्ती सोनटक्के, प्रवीण पडवेकर आदींसह ओबीसी मंडल यात्रेतील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.यात्रेच्या समारोपापूर्वी नागभीड, बल्लारपूरसह जिल्ह्यातील विविध भागांतून मंडल यात्रा काढण्यात आली.

### 'एकजुटीने लढा देण्याची गरज'

**कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रसिद्ध कवी नितीन चंदनशिवे यांनी आपल्या वक्तृत्वातून सरकारच्या धोरणांवर विनोदी शैलीत टीका केली. बहुजन समाजाने एकजूट होऊन आपल्या हक्कांसाठी लढा देण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले**

### लोकसंख्या ५२ टक्के निधी तुलनेत कमी

**मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचा संदर्भदेताना वडेट्टीवार म्हणाले, ङ्गजरांगे साहेब, आमचा तुम्हाला विरोध नाही.ङ्ग मात्र, ओबीसींच्या हक्कांवर गदा येता कामा नये. अण्णासाहेब पाटील महामंडळाला मोठ्या प्रमाणात निधी दिला जात असताना ५२ टक्के लोकसंख्या असलेल्या ओबीसींसाठी तुलनेने कमी निधी दिला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. धर्माच्या नावावर ओबीसी समाजाचा वापर केला जात असल्याचा आरोप करत त्यांनी समाजातील मूलभूत प्रश्नांकडे लक्ष वेधले. बेरोजगारी, महागाई, शिक्षणाचा वाढता खर्च, शेतकऱ्यांच्या समस्या, युवकांच्या रोजगाराचा प्रश्न आणि आरक्षण यांसारखे प्रश्न गंभीर असताना समाजाला धर्माच्या चौकटीत अडकवून दिशाहीन करण्याचा प्रयत्न होत असेल, तर त्याला बहुजन समाजाने ठामपणे विरोध केला पाहिजे, असे ते म्हणाले.**

## संपादकीय

# डिजिटल आर्थिक क्रांतीतील नवे पर्व

भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एके काळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी तासनतास रांगेत उभे रहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताने जगाला यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांचे एक अद्वितीय मॉडेल दिले. यूपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच यूपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील यूपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते.

या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील यूपीआय ॲप्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर यूपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएममधून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता रहात नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अनेकदा आपण एटीएम कार्ड घरी विसरतो किंवा ते पाकिटासह हरवते. अशा वेळी अचानक पैशांची गरज भासल्यास मोठी अडचण निर्माण होते. कार्डलेस एटीएममुळे ही समस्या पूर्णपणे दूर होते. आज बहुतांश लोकांकडे स्मार्टफोन असतो आणि त्यावर यूपीआय ॲप्स सक्रिय असतो. त्यामुळे केवळ मोबाईलच्या सहाय्याने पैसे काढणे शक्य होते. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये एटीएम स्किमिंग, कार्ड क्लोनिंग आणि डेटा चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. काही गुन्हेगार एटीएममध्ये गुप्त उपकरणे बसवून कार्डची माहिती चोरत आणि त्याद्वारे बनावट कार्ड तयार करत. परिणामी ग्राहकांच्या खात्यातील पैसे लुटले जात. कार्डलेस व्यवहारांमध्ये कार्डच वापरले जात नसल्यामुळे अशा प्रकारच्या गुन्ह्यांना मोठ्या प्रमाणात आळा बसतो. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो आणि बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित बनतात.

आज देशातील लाखो नागरिक यूपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्मविश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. अनेकदा वयोमानानुसार एटीएम कार्ड हाताळणे, कार्डचा पासवर्ड लक्षात ठेवणे किंवा मशीनमध्ये कार्ड योग्य प्रकारे वापरणे कठीण जाते. मोबाईलवरील परिचित यूपीआय ॲप्स वापरून व्यवहार करणे तुलनेने सोपे वाटू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे. पूर्वी वेगवेगळ्या खात्यांसाठी अनेक कार्ड सांभाळावी लागत. आता एकाच यूपीआय अनुप्रयोगामध्ये विविध खाती जोडलेली असल्यास आवश्यक त्या खात्यातून थेट पैसे काढता येतात.

विशेष म्हणजे भारताने या क्षेत्रात जगासमोर एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. अनेक विकसित देशांमध्ये कार्डशिवाय पैसे काढण्याच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या बहुधा विशिष्ट बँकेपुरत्या मर्यादित असतात. भारताने मात्र सर्व बँका, सर्व यूपीआय ॲप्स आणि सर्वसामान्य नागरिक यांना जोडणारी एक सार्वत्रिक आणि परस्परसंवादी व्यवस्था विकसित केली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणत्याही सक्षम एटीएमवर जाऊन यूपीआयच्या साहाय्याने पैसे काढू शकतो. ही संकल्पना जागतिक स्तरावर अत्यंत अभिनव मानली जाते. डिजिटल भारत मोहिमेला या सुविधेमुळे मोठी चालना मिळाली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने आधीच जागतिक नेतृत्व प्राप्त केले आहे. यूपीआय व्यवहारांची संख्या आणि त्याचा व्यापक वापर पाहता अनेक देश भारताच्या अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करत आहेत. कार्डलेस एटीएम ही त्याच यशस्वी प्रवासातील पुढची पायरी आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीनेही या सुविधेचे महत्त्व मोठे आहे. बँकिंग सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हे कोणत्याही विकसित अर्थव्यवस्थेचे ध्येय असते. डिजिटल साधनांच्या मदतीने नागरिकांना अधिक सक्षम करणे आणि त्यांना वित्तीय प्रणालीशी जोडणे हे या तंत्रज्ञानामुळे अधिक सुलभ झाले आहे. गावातील शेतकरी, छोटा व्यापारी, विद्यार्थी, गृहिणी किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला याचा थेट लाभ होऊ शकतो. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, आवाजावर आधारित सेवा आणि प्रादेशिक भाषांमधील संवाद यांचा वापर वाढल्यास कार्डलेस एटीएम आणखी लोकाभिमुख होतील.

# जमिनी वाचविण्यासाठी गडचिरोलीच्या शेतकऱ्यांच्या उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांना निवेदन

**गडचिरोली :-** गडचिरोली जिल्ह्याला स्टील हब बनविण्याच्या नावाखाली शासनाकडून विमानतळासह इतर प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर सुपीक शेतजमिनी अधिग्रहित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्याला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने सोमवारी (दि.३) नवी दिल्लीत उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. देशातील सहा खासदारांच्या शिष्टमंडळासह शेतकरी संघर्ष कृती समितीचे संयोजक महेंद्र ब्राह्मणवाडे यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा उपराष्ट्रपतींपर्यंत पोहोचवल्या. शेती हेच आमच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असल्यामुळे जमिनी गेल्यास अनेक शेतकरी कुटुंबांवर उपासमारीची वेळ येऊ शकते, अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.गडचिरोली तालुक्यातील हिरापूर-गुरुवळा परिसरात प्रस्तावित विमानतळासाठी होणाऱ्या जमीन अधिग्रहणाला स्थानिक शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. तसेच चामोर्शी तालुक्यातील भेंडाळा परिसरातील १४ गावांमध्ये तसेच जयरामपूर परिसरातील १३ गावांतील एमआयडीसी प्रकल्पासाठी होणाऱ्या जमीन अधिग्रहणालाही शेतकऱ्यांचा विरोध आहे.

जिल्ह्यातील कोणत्याही एमआयडीसी, विमानतळ अथवा इतर शासकीय प्रकल्पांसाठी सुपीक शेतजमिनी अधिग्रहित करू नये, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी यापूर्वी विविध निवेदने, आंदोलने, मोर्चे तसेच मुंडन आंदोलनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले आहे. याशिवाय शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची मुंबई येथे भेट घेऊन जमीन अधिग्रहणाचे आदेश रद्द करण्याची मागणी केली होती.

### हस्तक्षेप करून न्याय द्या

शिष्टमंडळाने उपराष्ट्रपतींना सांगितले की, गडचिरोली जिल्हा हा पेसा क्षेत्रात येत असून पेसा कायद्यानुसार ग्रामसभांना विशेष अधिकार प्राप्त आहेत. मात्र ग्रामसभांचा स्पष्ट विरोध असतानाही शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित करण्याची प्रक्रिया सुरू असल्याने हा पेसा कायद्याचा भंग आहे. त्यामुळे या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी त्यांनी केली. यावेळी खासदार प्रतिभा धानोरकर, खासदार वर्षा गायकवाड, खासदार श्यामकुमार बर्वे, खासदार प्रशांत पडोळे, खासदार गोवाल पाडवी,



खासदार सलंग ए सदमा, तसेच महेंद्र ब्राह्मणवाडे यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या शिष्टमंडळात मनोहर पा.पोरेटी, ॲड.दुष्यन्त नामदेव किरसान, दिवाकर निसार (हिरापूर), प्रमोद भगत, मिलिंद खोब्रागडे, प्रशांत कोराम, वसंत राऊत, राजेश ठाकूर, नेताजी गावतुरे, अनिल कोठारे, धिवरू मेश्राम, विकास जेंगठे, मारुती कांबळे, रवी बोदलकर, निकेश तुंकलवार, साईनाथ चलाख, सुनील कोहपरे, भक्तदास भगत, मनोज दहेलकर, गुरुदास ठुसे, वसंत बुर्णवार, तात्याजी चिचघरे, गुरुदास ठाकरे, विजय निकुरे, विजय लाड, नदीम नाथानी, विपुल एल्टीवार आदी शेतकरी उपस्थित होते.

# “मिशन पँथर १९७०’ चित्रपटाचे पहिले पोस्टर प्रदर्शित; पाच भाषांमध्ये संपूर्ण भारतात लवकरच झळकणार

**मुंबई :-** दलित पँथर चळवळीच्या सामाजिक आणि ऐतिहासिक संघर्षावर आधारित “मिशन पँथर १९७०’ या आगामी चित्रपटाचे पहिले पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले. अभिता फिल्म प्रॉडक्शन्स निर्मित या चित्रपटाचे पोस्टर चित्रपटाचे निर्माते तथा अभिता फिल्म प्रॉडक्शन्सचे उएज सुनील शेळके आणि दिग्दर्शक शैलेंद्र बागडे यांच्या हस्ते प्रदर्शित करण्यात आले.



“मिशन पँथर १९७०’ हा चित्रपट १९७०च्या दशकात अन्याय, सामाजिक विषमता आणि शोषणाविरोधात तसेच सामाजिक न्यायासाठी उभ्या राहिलेल्या दलित पँथर चळवळीच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. या चळवळीने अन्यायाविरोधात आवाज उठवत सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याला नवी दिशा दिली. या ऐतिहासिक चळवळीचा संघर्ष, विचार आणि सामाजिक परिवर्तनातील योगदान चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या चित्रपटात सुप्रसिद्ध अभिनेता चिन्मय मांडलेकर मुख्य भूमिकेत दिसणार असून, त्यांच्यासोबत अंजली पाटील, कैलास वाघमारे, कमलेश सावंत, संदेश जाधव, विनीत शर्मा, किरण बागडे, पार्थ तिवारी अंकुश गेडाम आणि गणेश देशमुख हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांमध्ये झळकणार आहेत. त्यामुळे दमदार कलाकारांची फळी आणि सामाजिक आशय यामुळे “मिशन पँथर १९७०’ या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे हा चित्रपट केवळ मराठी भाषेत मर्यादित न राहता हिंदी, तेलुगू, तमिळ आणि कन्नड या भाषांमध्येही प्रदर्शित होणार आहे. त्यामुळे “मिशन पँथर १९७०’ हा चित्रपट लवकरच संपूर्ण भारतात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

यापूर्वी सुनील शेळके यांच्या निर्मितीतील “सत्यशोधक’ या चित्रपटातून महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक कार्याचा आणि विचारांचा इतिहास रुपेरी पडद्यावर मांडण्यात आला होता. त्यानंतर आता सामाजिक न्यायाच्या चळवळीतील महत्त्वाचा अध्याय असलेल्या दलित पँथर चळवळीवर आधारित “मिशन पँथर १९७०’ हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असून, सामाजिक न्याय, समता आणि परिवर्तनाच्या लढ्याचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने हा चित्रपट महत्त्वाचा ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शेतकऱ्यांना धान खरेदीचे पैसे थेट बँक खात्यात मिळणार

## बँक खाते त्वरित आधार क्रमांकाशी संलग्न करावे

**गोंदिया:-** किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शेतकरी बांधवांना त्यांच्या धान खरेदीचे चुकारे (पैसे) विहित मुदतीत अदा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पणन हंगाम २०२६-२७ पासून योजनेंतर्गत नोंदणीकृत शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट त्यांच्या आधार क्रमांकाशी संलग्न (Aadhaar Seeded) असलेल्या बँक खात्यातच रक्कम जमा केली जाणार आहे.



अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने एनपीसीआय (NPCI) कडून मिळालेल्या माहितीच्या आधारे अशा शेतकऱ्यांची यादी तयार केली आहे, ज्या शेतकऱ्यांची बँक खाती अद्याप आधार कार्डशी संलग्न झालेली नाहीत. अशा शेतकऱ्यांची यादी गोंदिया जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर (Gondia District Official Website) शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार ही यादी नागरिकांच्या व शेतकऱ्यांच्या माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तरी संबंधित शेतकऱ्यांनी गोंदिया जिल्ह्याच्या संकेतस्थळाला भेट देऊन आपले नाव तपासावे व आपले बँक खाते त्वरित आधार क्रमाकांशी संलग्न (Adhaar Link) करुन घ्यावे, जेणेकरुन धान खरेदीचे चुकारे मिळण्यास कोणतीही अडचण निर्माण होणार नाहो. असे जिल्हा पुरवठा अधिकारी प्रकाश पाटील यांनी कळविले आहे.

# वडेगाव साथरोग गावात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गोल्हार यांची भेट



**साथरोग नियंत्रणासाठी आरोग्य विभाग पूर्णपणे सतर्क व ॲक्शन मोडवर असुन पावसाळ्यात डेंग्यू, मलेरिया, सर्दी, खोकला आणि गॅस्ट्रोसारख्या संसर्गजन्य आजारांचा फैलाव रोखण्यासाठी प्रशासनाकडून विशेष लक्ष देण्यात येत आहे.**
**-डॉ.अभिजीत गोल्हार, जिल्हा आरोग्य अधिकारी**

**देवरी:-** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र मुल्ला अंतर्गत वडेगाव येथे दि.६ ऑगस्ट रोजी दूषित पाण्यामुळे अतिसाराची साथ उदभवली होती.गुरुवारपासून वडेगाव गावात अतिसाराचे रुग्ण आढळून येत असून, पाच दिवसात ४५ जणांना या आजाराची लागण झाली होती. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांचे मार्गदर्शक सुचनेनुसार मुल्ला प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत आरोग्य विभागाचे एक पथक दि.६ ऑगस्टपासून वडेगाव येथे तैनात करण्यात आले आहे. हे पथक बाधित रुग्णांवर उपचार करण्यासोबतच संसर्ग नियंत्रणासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करीत आहे.ग्रामपंचायत व आरोग्य विभागाच्या एकत्रित सहकार्याने साथरोग आटोक्यात आणण्यात आली आहे.सद्य स्थितीत सर्व ४५ बाधित रुग्णांची प्रकृती ठिक आहे.

दि.१० ऑगस्ट रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांनी साथरोग वडेगावला भेट देवुन देत असलेल्या आरोग्य सेवा व प्रतिबंधात्मक उपाययोजनेची माहीती घेतली. यावेळी त्यांचे सोबत जिल्हा साथरोग अधिकारी डॉ.निरजंन अग्रवाल,प्राथमिक आरोग्य केंद्र मुल्लाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.वंजारी व डॉ.रामकृष्ण येळणे यांचेसह ईतर स्टाफ उपस्थित होते.

गावात पिण्याच्या पाण्यासाठी तीन बोअरवेल, तीन सौरपंप तसेच नळ योजनेच्या दोन पाण्याच्या टाक्या आहेत. त्यावर आवश्यक क्लोरिनेशन व पाणी नमुने तपासणीसाठी पाठविण्याचे निर्देश त्यांनी दिली.त्याच बरोबर ग्रामपंचायत प्रशासनाला पाण्याच्या टाक्यांची तातडीने स्वच्छता, पाईपलाईन व नळ दुरुस्ती तसेच साफसफाई करण्याच्या सुचना दिल्या. भविष्यात अशी परिस्थिती पुन्हा उद्भवू नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. साथरोग नियंत्रण आरोग्य पथकाव्दारे घरोघरी जाऊन तापाचे किंवा इतर साथरोगांचे रुग्ण शोधणे.

पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची तपासणी करणे, क्लोरिन व ब्लीचिंग पावडरची मात्रा तपासणे आणि दूषित पाणीपुरवठा रोखणे.डेंग्यू,मलेरियासारख्या आजारांसाठी डासांची उत्पत्ती केंद्र नष्ट करणे आणि औषध फवारणी करणे.नागरिकांमध्ये वैयक्तिक स्वच्छता, उकळून पाणी पिणे आणि सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्याचे सुचना यावेळी दिल्या.

# महिला लोकशाही दिनाचे आयोजन १७ ऑगस्टला

**गोंदिया :-** जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. महिलांच्या कोणत्याही विभागाशी संबंधित समस्या, वैयक्तीक समस्या, गाऱ्हाणी व अडीअडचणी ऐकून घेण्यासाठी दि.१७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या लोकशाही दिनामध्ये सर्व महिला कर्मचारी, महिला मंडळ, बचतगट व इतर महिलांसाठी काम करणाऱ्या संस्था येथील महिला थेट सभेमध्ये येवून वैयक्तीक तक्रार नोंदवू शकतात. न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहित नमून्यात नसणारे व आवश्यक कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवा विषयक, आस्थापना विषयक बाबी, तक्रार/निवेदने वैयक्तीक स्वरुपाचे नसेल तर ते अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

तरी सर्व पिडीत महिलांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयात व्यक्तीश: येऊन आपली तक्रार तीन प्रतीत सादर करावी. अर्जाचा नमूना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, नविन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, खोली क्र.३६, जयस्तंभ चौक, गोंदिया या कार्यालयात नि:शुल्क प्राप्त होईल.

तालुका स्तरावर दर महिन्याच्या चौथ्या सोमवारी तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्यासाठी संबंधित तालुक्याच्या बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) यांच्याकडे अर्ज सादर करावे. अर्जाचा नमूना बाल विकास अधिकारी यांचेकडे नि:शुल्क प्राप्त होईल. अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, गोदिया येथे संपर्क साधावा.

# मंडल यात्रेचे एकोडी येथे आगमन: जातनिहाय जनगणनेसाठी आणि न्यायहक्कांसाठी ओबीसी तरुणांनी लढ्यात उतरावे-विलास काळे



**एकोडी:-**विद्यार्थ्यांनी आपल्या न्यायहक्कांच्या लढ्यासाठी पुढे येणे अत्यंत गरजेचे आहे. ओबीसी प्रवर्गाची जातनिहाय जनगणना होत नसल्यामुळे आपल्याला आवश्यक प्रमाणात निधी, नोकऱ्या आणि शिक्षणामध्ये योग्य ते प्रतिनिधित्व मिळत नाही. ओबीसी तरुणांमध्ये उत्तम गुणवत्ता असूनही मुलाखतींच्या वेळी त्यांना डावलले जात असल्याने समाज मागे पडत आहे. त्यामुळे या न्यायहक्काच्या लढ्यात सर्व ओबीसी बांधवांनी व विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन ओबीसी जनमोर्चाचे उपाध्यक्ष विलास काळे यांनी केले. गोंदिया तालुक्यातील एकोडी येथे आयोजित “मंडल यात्रा’ आगमन प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सकल ओबीसी महामोर्चा व मंडल यात्रेचे संयोजक उमेश कोराम होते.

कार्यक्रमप्रसंगी बोलताना संयोजक उमेश कोराम यांनी सांगितले की, जातनिहाय जनगणनेसाठीची ही लढाई अत्यंत महत्त्वाची आहे. येत्या काळात जर जनगणना झाली नाही, तर आपला समाज विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहील. जनगणनेअभावी दरवर्षी ओबीसी समाजाचे सुमारे ९५ हजार कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. त्यांनी या वेळी उपस्थितांना ममहाज्योतीफ या शासकीय संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून करण्यात आली, त्यानंतर मंडल यात्रेतील सर्व पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सरपंच रवी पटले यांनी केले. या यात्रेला शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.



### प्रमुख उपस्थिती

या प्रसंगी जिल्हा परिषद सदस्या सौ. अश्विनी रवी पटले, पंचायत समिती सदस्य अजाबराव रिनायत, माजी प.स. सदस्य प्रकाश पटले, सरपंच शांतनू पारधी, सामाजिक कार्यकर्ते राजू कटरे, किरण मेश्राम, माजी सरपंच रवी पटले, प्रा. रमेश पिसे (ओबीसी जनमोर्चा), खेमेंद्र कटरे (ओबीसी अधिकार मंच), कैलास भेलावे, मनोज मेंढे (सरचिटणीस, ओबीसी संघर्ष कृती समिती), महेंद्र बिसेन, राजीव ठकरेले (ओबीसी महासभा), निखिल बनसोड (ओबीसी सेवा संघ), गौरव बिसेन, सुनील भोंगाडे (युवा बहुजन मंच), रवी भांडारकर, अतुल सतदेवे (संविधान मैत्री संघ), शिव नागपूरे, अशोक काकडे, शंकर पाल आणि माजी सरपंच अशोक रिनायत आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

### यात्रेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शंकर पेशने, दीपक रिनायत, राजेश तायवाडे, मुख्याध्यापक एम. एच. पटले, पुरुषोत्तम भदाडे, खोमेश तुरकर, मुन्ना बिसेन, देवलाल टेंभरे, अरुण बिसेन, इंजमाम तेले, मयुर रिनायत, धर्मेंद्र कनोजे, बंटी रिनायत, ओमेंद्र चौधरी, राकेश बिसेन, बालू भदाडे, नीरज रिनायत, वासुदेव बिसेन, चोपलाल टेंभरे आणि श्री. जगणे यांनी विशेष सहकार्य केले.

# एम्स नागपूरचा सामाजिक पुढाकार: एडीएचडीग्रस्त ६ वर्षीय बालकाला मोफत उपचार; पालकांच्या चेहऱ्यावर पसरले समाधान

**नागपूर:-**आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे महागड्या वैद्यकीय उपचारांपासून वंचित राहणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबांसाठी नागपूरचे ‘ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस’ (एआयआयएमएस) मोठा आधार ठरत आहे. अत्यंत चंचलपणा (एडीएचडी) आणि शिकण्यात अडचणी येणाऱ्या माधव (नाव बदललेले) या अवघ्या ६ वर्षांच्या बालकावर ‘एआयआयएमएस’च्या पेडियाट्रिक एनसीडी (NCD) क्लिनिकमध्ये पूर्णपणे मोफत उपचार सुरू करण्यात आले असून, बालकाच्या वर्तनात सकारात्मक सुधारणा दिसून येत आहे.

काय होती बालकाची समस्या?

मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या एका गरीब कुटुंबातील हा ६ वर्षांचा बालक आहे. तो वर्गात किंवा घरी एका जागी स्थिर बसू शकत नव्हता. सतत फिरणे, अतिसंभाषण, इतरांचे बोलणे मध्येच तोडणे आणि अभ्यासात अजिबात लक्ष न लागणे अशा समस्या त्याला भेडसावत होत्या. वर्गात तो एका जागी बसत नसल्याने त्याच्या आईला वर्गखोलीत त्याच्यासोबत बसून राहावे लागत होते. याशिवाय ओले कपडे अंगावर न ठेवणे आणि विशिष्ट संवेदनांची तीव्र प्रतिक्रिया देणे, अशा मसेंसरी प्रोसेसिंगफ्च्या समस्याही त्याच्यात दिसून आल्या. बालकाच्या आईलाही लहानपणी शिकताना अशाच अडचणी आल्याचे पालकांनी सांगितले.




### ‘एआयआयएमएस’मध्ये मोफत आणि बहुआयामी उपचार

खाजगी पुनर्वसन केंद्रांचा खर्च परवडणारा नसल्याने पालकांनी ‘एआयआयएमएस’च्या पेडियाट्रिक एनसीडी क्लिनिकमध्ये धाव घेतली. डॉक्टरांनी बालकाची गंभीर स्थिती लक्षात घेऊन त्याच्यावर तातडीने मोफत उपचार सुरू केले. यामध्ये खालील घटकांचा समावेश आहे:

**बिहेवियरल थेरपी (वर्तन उपचार):** बालकाचे लक्ष केंद्रित करणे, स्व-नियंत्रण वाढवणे आणि वर्गातील वर्तन सुधारण्यासाठी थेरपी.

**प्ले अँड लर्न थेरपी:** खेळाच्या माध्यमातून शिकण्याची क्षमता, संवाद आणि बौद्धिक कौशल्ये विकसित करणे.

**आर्ट थेरपी:** कला उपक्रमांतून बालकाचा एकाग्रतेचा काळ वाढवणे, भावना व्यक्त करणे आणि सूक्ष्म स्नायूंचा विकास (फाइन मोटर स्किल्स) साधणे.

**पालकांचे समुपदेशन:** उपचारांचे सातत्य राखण्यासाठी पालकांना घरीच बालकाच्या वर्तनाचे व्यवस्थापन करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

### सततचे निरीक्षण आणि सुधारणा

‘एआयआयएमएस’मधील तज्ज्ञ डॉक्टरांची टीम बालकाच्या विकासावर आणि उपचारांच्या प्रगतीवर नियमित लक्ष ठेवून आहे. वैद्यकीय उपचारांसोबतच मिळालेल्या मोफत समुपदेशनामुळे आणि योग्य मार्गदर्शनामुळे बालकाच्या वर्तनात सुधारणा होत असून, आर्थिक विवंचनेत असलेल्या पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. गरीब आणि गरजूंसाठी ‘एआयआयएमएस’चे हे पाऊल अत्यंत कौतुकास्पद ठरत आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# कर्जमुक्ती योजनेंतर्गत चिचगड येथे भव्य शेतकरी मार्गदर्शन व ई-केवायसी शिबीर

**गोंदिया :-** महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६ अंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण (श–घधउ), कर्ज खाते पडताळणी व मार्गदर्शन शिबीर आज गोंडवाना गोटूळ, चिचगड येथे मोठ्या उत्साहात व यशस्वीपणे संपन्न झाले. या शिबिरास सुमारे २५०० शेतकरी लाभार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमास आमदार संजय पुराम, देवरी उपविभागीय अधिकारी कविता गायकवाड, देवरी तहसीलदार धनंजय देशमुख, चिचगड तहसीलदार नवनाथ कातकडे, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था राजविलास बोरकर, चिचगड ठाणेदार जनार्दन हेगडकर, गटविकास अधिकारी देवरी, तालुका कृषी अधिकारी देवरी, तसेच विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि सर्व प्रमुख बँकांचे शाखा व्यवस्थापक उपस्थित होते.

या शिबिरामध्ये पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण (श–घधउ), कर्ज खात्यांची पडताळणी, बँकनिहाय मार्गदर्शन, आवश्यक कागदपत्रांची तपासणी व लाभार्थी समस्यांचे तत्काळ निराकरण करण्यात आले. विविध बँकांनी स्वतंत्र हेल्प डेस्क उभारून लाभार्थ्यांना आवश्यक सेवा उपलब्ध करून दिली.

कार्यक्रमात आमदार संजय पुराम यांनी शासनाच्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन व बँकांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन केले. उपविभागीय अधिकारी कविता गायकवाड यांनी ई–केवायसी प्रक्रिया वेळेत पूर्ण करून पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी प्रभावी समन्वय राखण्याचे निर्देश दिले.



कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महसूल विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग, पंचायत समिती, पोलीस विभाग, आरोग्य विभाग, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, सर्व ग्रामपंचायती तसेच एचडीएफसी बँक, आयडीबीआय बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र ग्रामीण बँक, बँक ऑफ बडोदा, गोंदिया जिल्हा मध्यवर्ती कोऑपरेटीव्ह बँक लिमिटेड देवरी व कॅनरा बँक देवरी यांनी मोलाचे सहकार्य केले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल तहसीलदार नवनाथ कातकडे यांनी सर्व विभागीय अधिकारी, कर्मचारी, बँक प्रतिनिधी, ग्रामपंचायत पदाधिकारी आणि उपस्थित सर्व शेतकरी बांधवांचे आभार मानले.

# आदिवासी दिनानिमित्त 'जय सेवा'चा गजर





**गोंदिया :-** जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून आदिवासी समाज संघटनेच्या वतीने आज ९ ऑगस्ट रोजी गोंदिया शहरात महारॅलीचे आयोजन करण्यात आले होते. हजारोच्या संख्येत सहभागी झालेल्या समाज बांधवांनी परिधान केले पिवळे पोषाख व हातत पिवळे झेंड्यांमुळे गोंदिया शहर पिवळ्या रंगात रंगाला. गोंदिया भ्रमणासाठी निघालेल्या महारॅलीत आदिवासी संस्कृतीचे दर्शनही झाले. त्याच बरोबर जय सेवा... जय बिरसा मुंडा... तसेच संविधानाची रक्षा आम्ही करू अशा घोषणांनी शहरासह जिल्हा दुमदुमला होता.

जिल्ह्यात (ता. ९) जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्ह्यातील गावा–गावात तथा आदिवासी बहुल ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होत. या दिनाचे औचित्य साधून आज गोंदिया शहरात आदिवासी बांधवांच्या विविध संघटनांच्या वतिने महारॅलीचे आयोजन करण्यात आले होते. महारॅली पुर्वी सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत आदिवासी समाज संघटनांच्या पुढाऱ्यांनी समाजबांधवांना मार्गदर्शन केले. यानंतर महारॅली शहर भ्रमणासाठी निघाली.

शहरातील नवीन प्रशासकीय इमारत, आंबेडकर चौकात आदिवासी समाजातील लोक मोठ्या संख्येने जमा झाले आणि जयस्तंभ चौकातून आंबेडकर चौक, नेहरू चौक, गोरेलाल चौक, दुर्गा चौक, चांदणी चौक, गांधी चौक, जयस्तंभ चौक, उड्डाणपूल, मरारटोली बसस्थानक मार्गे आंबेडकर भवन मरारटोली येथे रॅलीचा समापन करण्यात आला. रॅलीत जमलेल्या लोकांनी जय सेवा, जय आदिवासी, जय बिरसा मुंडा अशा घोषणा दिल्या.

## एनडीआरएफ, नागपूर येथे क्विक हील फाउंडेशनतर्फे सायबर सुरक्षा जनजागृती अभियान

**नागपूर :** – वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर क्विक हील फाउंडेशनतर्फे एनडीआरएफ, नागपूर येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात एनडीआरएफचे अधिकारी व जवानांना सायबर गुन्ह्यांचे प्रकार, ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, बनावट लिंक, ओटीपी व पासवर्डची सुरक्षितता तसेच सोशल मीडियाचा सुरक्षित वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात मानसी भास्कर व वैदेही ठावकर यांनी सायबर सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण माहिती देत डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाच्या खबरदारीच्या उपायांची माहिती दिली. उपस्थितांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारले. अशा जनजागृती उपक्रमांमुळे सायबर गुन्ह्यांबाबत जागरूकता वाढून सुरक्षित डिजिटल समाज घडविण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.



# प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेच्या ऑपरेटरांना सेवेत कायम करा

**गोंदिया :-** महाराष्ट्रातील शाळांमधील लाखो विद्यार्थ्यांच्या पोषणाशी निगडित असलेल्या प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेचे काम वर्षानुवर्षे जबाबदारीने सांभाळणाऱ्या सुमारे ३०० ऑपरेटरांच्या पदरी अद्यापही अस्थिरतेचे सावट आहे. त्यामुळे शासनाने या ऑपरेटरांना सेवेत कायम करावे या मागणीचे निवेदन पत्की यांना सोमवारी मुख्यमंत्र्यांच्या नावे जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.



दिलेल्या यावेळी निवेदनातून शासनाच्या योजनांची अंमलबजावणी तळागाळापर्यंत पोहोचविण्यात या ऑपरेटरची भूमिका महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराशी संबंधित माहिती, नोंदी, अहवाल आणि ऑनलाइन कामे केली आहेत.त्यांनी वर्षानुवर्षे आपली सेवा बजावली. काम कायमचे, जबाबदारी कायमची; मग सेवा मात्र कंत्राटीच का? हा प्रश्न आज त्यांना सतावत आहे. अलीकडेच शासनाने समग्र शिक्षा अभियानांतर्गत अधिक कंत्राटी सेवा पूर्ण केलेल्या ३,२७६ कर्मचाऱ्यांना विशेष बाब म्हणून समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करून नियुक्ती देण्यास मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे दीर्घकाळ काम करणारे कर्मचारी यांच्या मनात आशेचे किरण निर्माण झाले असून आमची संख्या कमी आहे पण आमचा प्रश्न छोटा नाही आम्ही मोजके आहोत म्हणून आमच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होऊ नये. आम्हीही वर्षानुवर्षे शासनाची सेवा केली आहे. शासनाच्या महत्त्वाच्या योजनेचे काम प्रामाणिकपणे केले आहे. इतर कर्मचाऱ्यांना न्याय मिळत असेल, तर आम्हालाही त्याच धर्तीवर न्याय मिळावा. आमच्या कुटुंबाच्या भविष्याचा विचार करून आम्हाला सरसकट कायम करावे, अशी भावनिक मागणी प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेतील ऑपरेटरांनी केली आहे. ३०० च्या आसपास कर्मचाऱ्यांना सेवासुरक्षितता देणे हा शासनासाठी मोठा भार नसून, त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा आधार ठरू शकतो. वर्षानुवर्षे शासनाच्या योजनेसाठी योगदान देणाऱ्या या कर्मचाऱ्यांना आता केवळ आश्वासन नको, तर त्यांच्या सेवेला योग्य तो न्याय हवा आहे.

आशांना नवा आधार मिळाला आहे. मग प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेतील अवघ्या सुमारे ३०० ऑपरेटरांचा शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांनाही सरसकट कायम करावे अशी मागणी केली आहे.

समग्र शिक्षा अभियानाच्या कर्मचाऱ्यांमुळे या ऑपरेटरांच्या मनातही आशेचा किरण निर्माण झाला आहे. त्यामुळे शासनाने कोणताही भेदभाव न करता प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेतील सर्व ऑपरेटरांचा सरसकट विचार करून त्यांना कायमस्वरूपी सेवासुरक्षितता द्यावी, अशी मागणी राज्याध्यक्ष दीपक पसरटे, राज्य संघटक सिद्धार्थ सोनकांबळे, जिल्हाध्यक्ष गौरव रामेवार, शीतल फुल्लूके, स्मिता करंजेकर, रवींद्र रहांगडाले, निशरत शेख, शुभम उईके, यश गलपल्लीवार, पायल हुकरे, प्राजक्ता बोहरे इत्यादी यांनी केली आहे.

### भंडारा जिल्ह्यामध्ये जलसंधारण सप्ताहाचे आयोजन

**भंडारा :-** पाणी ही अमूल्य नैसर्गिक संपत्ती असून भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जलसंधारण व पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर १५ ते २१ ऑगस्ट २०२६ दरम्यान जलसंधारण दिनानिमित्त जिल्ह्यात जलसंधारण सप्ताह/अभियान राबविण्यात येणार आहे.

या बैठकीला जिल्हाधिकारी सावन कुमार, जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता महेश सेलूकर, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सुशांत गडकरी उपस्थित होते. या अभियानांतर्गत नागरिकांमध्ये जलसंधारणाबाबत जनजागृती करणे, पावसाच्या पाण्याचे संधारण व पुनर्भरण करणे, जलस्रोतांचे संवर्धन करणे तसेच उपलब्ध पाण्याचा योग्य व काटकसरीने वापर करण्याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

जलसंधारण सप्ताहादरम्यान ग्रामपंचायत, शाळा–महाविद्यालये, शासकीय कार्यालये तसेच विविध सामाजिक संस्थांच्या सहभागातून जलसंधारणाची शपथ, जनजागृती फेरी, व्याख्याने, पोस्टर व घोषवाक्य स्पर्धा, जलस्रोत स्वच्छता, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण, जलपुनर्भरणाच्या उपाययोजनांबाबत प्रबोधन आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

## गोंदिया जिल्हा सौर संघटनेची स्थापना



**गोंदिया:-** जिल्ह्यातील सौर ग्राहक आणि सौर विक्रेत्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी गोंदिया जिल्हा सौर संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. संघटनेचे अध्यक्ष शिवम कमलेश अग्रवाल (खोखरे) यांनी सांगितले की, सौर ग्राहकांना योग्य मार्गदर्शन करणे, दर्जेदार सेवा सुनिश्चित करणे आणि सौर विक्रेत्यांच्या समस्या संबंधित विभागांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवून त्यांचे निराकरण सुनिश्चित करणे, हे संघटनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यांनी सांगितले की, ही संघटना जिल्ह्यात सौर ऊर्जेचा अवलंब वाढवण्यासाठी, दर्जेदार

सौर सेवांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि सौर उद्योगाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी सातत्याने काम करेल.

कार्यकारिणीत अध्यक्ष शिवम कमलेश अग्रवाल, उपाध्यक्ष वैभव युवातंत्र मारेदे, सचिव दिमंथर तुकाराम सातवणे, सहसचिव पियुष राजेंद्र तिवारी, खजिनदार आशिष रामदेव माखिंजा, तसेच सदस्य कौस्तुभ सुनील देवकाते, बिरेंद्र रमेश भैसारे, अर्पित राधेश्याम राधेशाम, मुसळधार मुशी, राधेश अकबर आदींचा समावेश आहे. ढेकवार आणि आदित्य देवराम बागडकर, जिल्ह्यातील सर्व सौर विक्रेते आणि ग्राहकांना संस्थेमध्ये सामील होण्याचे आवाहन करण्यात आले आहे आणि सौर उर्जेच्या प्रचारासाठी आणि सौर क्षेत्राच्या विकासासाठी सक्रिय सहकार्य करावे

# जातनिहाय जनगणनेसाठी सर्वांनी ताकदीने लढा द्यावा–खेमेंद्र कटरे

## तिरोड्यात ममंथन मंडल यात्रेच्चे उत्स्फूर्त स्वागत; ओबीसी पदाधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती

**तिरोडा:-** ओबीसींच्या जातनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी राज्यभरात जनजागृती करत निघालेल्या ममंथन मंडल यात्रेच्चे तिरोडा येथे ओबीसी समाज बांधवांच्या वतीने अत्यंत उत्साहात आणि भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात बोलताना ओबीसी अधिकार मंचचे संयोजक खेमेंद्र कटरे यांनी, ङ्गजातनिहाय जनगणनेसाठी लढा देणे हा प्रत्येक ओबीसी बांधवाचा घटनात्मक हक्क असून, या न्याय्य हक्काच्या लढ्यात सर्वांनी पूर्ण ताकदीने एकत्र उभे राहावे,ङ्ख असे आवाहनात्मक प्रतिपादन केले.




याप्रसंगी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी सांगितले की, जातनिहाय जनगणना झाल्यास त्याचा थेट फायदा समाजातील युवक, विद्यार्थी आणि शेतकऱ्यांना होणार आहे. तसेच प्रशासकीय सेवेत आणि धोरण निर्मितीत ओबीसी समाजाला त्यांचा हक्काचा वाटा व अधिकार मिळण्यासाठी ही जनगणना अत्यंत आवश्यक आहे.

या स्वागत सोहळ्याला आणि सभेला ओबीसी संघर्ष कृती समितीचे महासचिव मनोज मेंढे, कैलास भेलावे,ओबीसी सेवा संघाचे निखील बनसोड महेंद्र बिसेन, युवा बहुजन मंचचे सुनील भोंगाडे, रवी भांडारकर,गौरव बिसेन,अशोक काकडे,शंकर पाल,श्रीकृष्ण पडोळे तसेच ओबीसी विद्यार्थी आघाडीचे गौरव बिसेन प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रम प्रसंगी तिरोडा तालुका ओबीसी संघटनेचे पदाधिकारी ए. डी. शरणागत यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नगरसेवक पी. आर. पारधी, वाय. बी. चव्हाण, पी. टी. रंगारी, पी. एल. पारधी, सी. बी. बोपचे, प्रदीप पटले, मनोज गेडाम, दिलीप शेंडे, पृथ्वीराज पटले, एस. डी. कटरे आणि ए. डी. शरणागत यांच्यासह तिरोडा तालुका ओबीसी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## ६६ शासकीय कार्यालयात "पॉश' अंतर्गत समितीची स्थापना पूर्तता न करणाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**गोंदिया :-** कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळ प्रतिबंध मनाई आणि निवारण अधिनियम २०१३ अन्वये जिल्ह्यातील ज्या शासकीय/खाजगी आस्थापनामध्ये १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी असतील अशा सर्व शासकीय व खाजगी आस्थापनामध्ये अंतर्गत समिती स्थापना करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

पॉश ॲक्ट २०१३ अंतर्गत गोंदिया जिल्ह्यात ७१ शासकीय कार्यालये व ६ खाजगी कंपन्यांची तपासणी करण्यात आली असून अंतर्गत समिती स्थापन न केलेल्या कार्यालयांना पूर्तता न केल्याबद्दल जिल्हा स्तरावरुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

जिल्ह्यातील सर्व शासकीय व खाजगी कार्यालये, संस्था, कंपन्या, त्यांच्या शाखांनी पॉश ॲक्ट २०१३ मधील तरतुदी व सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली यांचे आदेशानुसार त्यांचे कार्यालयाची केंद्र शासनाच्या शी बॉक्स पोर्टलवर नोंद, अंतर्गत समितीची स्थापना व नोंद, समितीचे प्रशिक्षण, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, वार्षिक अहवाल इत्यादीवरील पोर्टल अद्ययावत करणे बंधनकारक आहे. तपासणीवेळी पूर्तता केली नसल्याचे आढळून आल्यास संबंधित कार्यालये, संस्था, कंपन्या यांचेवर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

पॉश ॲक्ट २०१३ मधील तरतुदी व सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली यांचे आदेशानुसार याबाबत पुर्तता केली किंवा नाही यासाठी राज्यातील शासकीय व खाजगी कार्यालये, संस्था, कंपन्या, त्यांच्या शाखांची राज्याच्या महिला व बाल विभागामार्फत ४०० पेक्षा जास्त तपासणी अधिकाऱ्यांकडून जून २०२६ पासुन तपासणी सुरू केली आहे. सद्यस्थितीत राज्यातील ३,५७९ शासकीय कार्यालये व ३२९६ खाजगी कंपन्यांची अशा एकुण ६,८७५ तपासण्या करण्यात आल्या असून २९४ शासकीय व ३७८ खाजगी कार्यालयांना पूर्तता न केल्याबद्दल जिल्हा स्तरावरुन राज्यात एकुण ६७ कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या आहेत. नोटीस दिलेल्या कार्यालयांनी विहीत वेळेत पुर्तता न केल्यास अधिनियमालील तरतुदीनुसार रु. ५०,०००/– पर्यंत दंड आकारण्याची कारवाई संबंधीत जिल्हाधिकारी व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून करण्यात येत आहे.

### बोंडगांव देवी–खांबी मार्गावरील पुलाची दुरुस्ती करा

**अर्जुनी मोरगाव :-** तालुक्यातील खांबी हे परिसरातील प्रमुख व महत्त्वाचे गाव असून बोंडगांव देवी – खांबी मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. मात्र या मार्गाच्या मध्यभागी असलेल्या जुन्या व जीर्ण पुलाची अवस्था धोकादायक झाल्याने एसटी महामंडळाच्या साकोली आगाराची बससेवा मागील ४ महिन्यांपासून बंद करण्यात आली आहे. त्यामुळे खांबीसह परिसरातील गावांमधील शाळकरी विद्यार्थी, वृद्ध, महिला तसेच सर्वसामान्य प्रवाशांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे.

# शिक्षणाच्या माध्यमातून समाजाची प्रगती साधा; बिरसा मुंडांच्या विचारांनी पुढे जा-आमदार राजकुमार बडोले

### अर्जुनी मोरगाव येथे विश्व आदिवासी दिनानिमित्त समाजप्रबोधन मेळावा व विद्यार्थी सत्कार सोहळा



**अर्जुनी मोरगाव :-** शिक्षण, संघटन आणि आपल्या हक्कांविषयी जागरूकता हीच आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली आहे. आपण विकासाच्या प्रवाहात काही प्रमाणात मागे असलो तरी भगवान बिरसा मुंडा यांच्या विचारांचा आदर्श घेऊन पुढे जाण्याची गरज आहे. जल, जंगल आणि जमीन यासाठी आदिवासी समाजाने मोठा संघर्ष व बलिदान दिले आहे. भारतीय संविधानामुळे आपल्या हक्कांना संरक्षण मिळाले असून, या अधिकारांवर कोणतीही गदा येऊ नये यासाठी प्रत्येकाने शिक्षण घेऊन सक्षम झाले पाहिजे, असे प्रतिपादन आमदार राजकुमार बडोलेनी केले.

विश्व आदिवासी दिनानिमित्त अर्जुनी मोरगाव येथे आयोजित समाजप्रबोधन मेळावा व आदिवासी विद्यार्थी सत्कार सोहळ्यात बोलत होते.

यावेळी आमदार बडोले म्हणाले की, आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा आणि अस्मिता ही आपली मोठी ताकद आहे. आधुनिक शिक्षण आणि विकास स्वीकारतानाच आपल्या समृद्ध संस्कृतीचे जतन करणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक युवक–युवतीने उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत मोठे स्थान निर्माण करावे. शिक्षणामुळे आपल्याला आपल्या घटनात्मक अधिकारांची जाणीव होईल आणि आपल्या हक्कांसाठी सक्षमपणे आवाज उठविता येईल.

आपल्या समाजाच्या विकासासाठी शासनाच्या विविध योजना आहेत. या योजनांचा जास्तीत जास्त लाभ आदिवासी बांधवांनी घ्यावा. केवळ शासनाच्या योजनांवर अवलंबून न राहता शिक्षण, कौशल्य आणि कष्टाच्या बळावर समाजातील प्रत्येक घटकाने प्रगती साधली पाहिजे. भविष्यातील पिढ्यांचा विचार करून समाजहिताला प्राधान्य देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे असे आवाहन आमदार बडोलेनी केले.

आदिवासी समाजाच्या प्रलंबित वनहक्क जमिनींच्या पट्ट्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून पात्र लाभार्थ्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाहीही यावेळी दिली.

कार्यक्रमात आदिवासी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन करत आमदार बडोले यांनी सत्कारार्थी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, पंचायत समिती उपसभापती संदीप कापगते, पंचायत समिती सदस्य डॉ. नाजुक कुंभरे, होमराज पुस्तोडे, फुलचंद बागडेरिया, भाग्यश्री सयाम, सविता कोडापे, नगराध्यक्ष मंजुषा बारसागडे, माजी सभापती तानेश ताराम, आदिवासी संघटनेचे युवाध्यक्ष मंगेश भलावी, माजी जि.प. सदस्य रतिराम राणे, नगरसेविका सपना उपवंशी, शिला उईके, सुनीता कोकोडे, बिरसा मुंडा समितीचे अध्यक्ष लीलाधर ताराम, आदिवासी कंवर समाजाचे अध्यक्ष सुनेर सोनटपर, बौद्ध महासभा तालुकाध्यक्ष सोमदाश गणवीर, पीपल फेडरेशनचे अध्यक्ष राजकुमार गेडाम, माजी पं.स. सदस्य जागेश्वर भोगारे, पी.एस. कुंभरे, हरिचंद उईके, लक्ष्मीकांत मडावी, मुरारी पंधरे, भुवन औराशे, पराग कापगते, नाना शहारे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच मोठ्या संख्येने आदिवासी समाजबांधव उपस्थित होते.

# ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी मोफत नवोदय मार्गदर्शन वर्गाचा उपक्रम कौतुकास्पद-जि.प.अध्यक्ष लायकराम भेंडारकर

### ग्रामीण विद्यार्थ्यांना नवोदयच्या तयारीसाठी मोफत मार्गदर्शन

**अर्जुनी–मोरगाव:-** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता व क्षमता मोठ्या प्रमाणात आहे. मात्र, आर्थिक परिस्थिती अथवा विविध कारणांमुळे त्यांना दर्जेदार मार्गदर्शन वर्गाचा लाभ घेता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन समूह साधन केंद्र, सिलेझरी यांच्या वतीने जिल्हा परिषद हायस्कूल, बोंडगाव देवी येथे इयत्ता सहावीच्या नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा सत्र २०२६–२७ साठी सर्व विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यात आला आहे. हा उपक्रम ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी निश्चितच महत्त्वपूर्ण ठरेल, असे प्रतिपादन जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी केले.

या मोफत मार्गदर्शन वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित राहून जि.प. अध्यक्ष भेंडारकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना मार्गदर्शन केले. नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेची योग्य व नियोजनबद्ध तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास, सराव आणि वेळेचे योग्य नियोजन करावे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी उपलब्ध करून देण्यात आलेल्या या संधीचा पुरेपूर लाभ घेऊन आपल्या गुणवत्तेच्या जोरावर नवोदय विद्यालयात प्रवेश मिळिवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, ङ्गग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण व मार्गदर्शन मिळणे ही काळाची गरज आहे. आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळा येऊ नये, यासाठी अशा प्रकारचे मोफत मार्गदर्शन वर्ग अत्यंत उपयुक्त आहेत. नवोदयची तयारी करताना विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेचे मार्गदर्शनच नव्हे, तर भविष्यातील शैक्षणिक वाटचालीसाठी दिशा, आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक वृत्ती मिळेल.

समूह साधन केंद्र, सिलेझरी यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना नवोदय प्रवेश परीक्षेची तयारी करण्यासाठी स्थानिक पातळीवरच मार्गदर्शन उपलब्ध झाले आहे.



त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांमध्येही समाधानाचे वातावरण आहे.

कार्यक्रमाला पंचायत समितीचे उपसभापती संदिप कापगते, पं.स. सदस्या कुंदा लोगडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धम्मपाल वालदे, माजी सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य राधेश्याम झोळे, माजी जि.प. सदस्य डॉ. श्यामकांत नेवारे, केंद्रप्रमुख बी. भानारकर, पोषण आहार पर्यवेक्षिका मंगला रामटेके, माजी उपसरपंच सुखदेव मेंढे, पतिराम मेश्राम, निलकंठ राउत, संजय गिऱ्हेपुंजे, ममत्ता बरैय्या, दिपक नेवारे, संतोष शहारे, मुख्याध्यापक अनिल कापगते, जि.प. शाळेचे मुख्याध्यापक दुधराम बारापात्रे, ग्रामपंचायत सदस्य माया मेश्राम, निराशा मेश्राम, संतोष मेश्राम यांच्यासह इतर मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार,दि.१२ ऑगस्ट २०२६ ४

# "मंडल यात्रेचे" गोंदिया जिल्ह्यात जल्लोषात स्वागत; ओबीसींच्या जनगणेकरिता एल्गार!



गोंदिया:– ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी समाजातील विद्यार्थ्यांना व युवकांना त्यांच्या घटनात्मक अधिकारांची जाणीव करून देण्यासाठी तसेच बी. पी. मंडल आयोगाच्या शिफारशींबाबत जनजागृती करण्यासाठी विदर्भातील सात जिल्ह्यांमध्ये ङ्गमंडल आयोग जनजागृती यात्राफ आयोजित करण्यात आली आहे. यात्रेचे मुख्य संयोजक उमेश कोराम यांच्या नेतृत्वात ही यात्रा निघालेली असून त्यांच्यासोबत प्रा. रमेश पिसे, विलास काळे, रोशन उरकुडे, श्री. पडोळे, अशोक काकडे आणि श्री. पाल यांचा सक्रिय सहभाग आहे. ३ ऑगस्ट रोजी भंडारा येथून निघालेल्या या भव्य यात्रेचे ७ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा येथे आगमन झाले असता स्थानिक नागरिकांनी व विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी तिचे अत्यंत उत्साहात व भव्य स्वागत केले.

या यात्रेदरम्यान गोंदिया जिल्ह्यात ठिकठिकाणी कॉर्नर सभा व जनजागृती कार्यक्रमांचा धडाका पाहायला मिळाला. सकाळी १० वाजता एकोडी येथे भव्य कॉर्नर सभा पार पडल्यानंतर सकाळी ११ वाजता गोंदियातील ऐतिहासिक राणी अवंतीबाई चौक, ११.३० वाजता गोरेगाव, दुपारी १२.३० वाजता आमगाव, दुपारी २ वाजता सडक अर्जुनी आणि सायंकाळी ३ वाजता नवेगावबांध येथे सभांचे आयोजन करण्यात आले. या सर्व सभांमधून ओबीसींची जातनिहाय जनगणना, विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांवर परखड चर्चा करण्यात आली.

या यात्रेचा मुख्य उद्देश ओबीसी, व्हीजेएनटी व एसबीसी समाजातील विविध समस्यांवर मात करणे आणि बी. पी. मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी आजच्या परिस्थितीत किती आवश्यक आहे, याची जाणीव करून देणे हा आहे. याद्वारे विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, ङ्गमहाज्योतीफ व ओबीसी आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ, शिष्यवृत्तीचे प्रश्न, ओबीसींची स्वतंत्र जातनिहाय जनगणना यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर समाज, युवक, अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये व्यापक जनजागृती केली जात आहे.



या मंडल यात्रेच्या यशस्वीतेसाठी जिल्ह्यातील अनेक प्रमुख बहुजन संघटना एकत्र आल्या आहेत. यामध्ये ओबीसी अधिकार मंच, ओबीसी संघर्ष कृती समिती, ओबीसी सेवा संघ, संविधान मैत्री संघ, भारतीय पिछडा शोषित संघ, स्टुडंट्स राईट्स असोसिएशन, युवा बहुजन एकता मंच, सकल ओबीसी समाज, ओबीसी अधिकारी कर्मचारी महासंघ आणि शिक्षण बचाव समिती यांचा सहभाग आहे.

ही यात्रा यशस्वी करण्यासाठी ओबीसी अधिकार मंचचे संयोजक खेमेंद्र कटरे, ओबीसी संघर्ष कृती समितीचे महासचिव मनोज मेंढे, शिशिर कटरे, कैलास भेलावे, सुनील पटले, बंटीभाऊ पंचबुद्धे, ओबीसी महासभेचे इंजि. राजीव ठाकरेले, ओबीसी सेवा संघाचे उपाध्यक्ष सी. पी. बिसेन,भुमेश शेंडे, निखिल बनसोड, संविधान मैत्री संघाचे अतुल सतदेवे, वसंत गवळी, युवा बहुजन मंचचे सुनील भोंगाडे, रवी भांडारकर,, शिव नागपूरे, डॉ. भुमेश ठाकरे, नरेश परिहार, रवी पटले, अजाबराव रिनायत, महेंद्र बिसेन, हरीश ब्राम्हणकर, प्रकाश पटले, किरण मेश्राम, अशोक रिनाईत, पंकज मेश्राम, राजूभाऊ कटरे, नगराध्यक्ष सचिन शेंडे, नगरसेवक चंदू चुटे, शिवसेना नेते डॉ. प्रशांत कटरे, लोधी समाज संघटनेचे रामेश्वर लिल्हारे, ऋषीकांत शाहू, बाबा बिसेन, अरुण पारधी, अमर वराडे, सावन डोये, सविता बेदरकर, भागचंद रहांगडाले आणि गौरव बिसेन या सर्व ओबीसी–बहुजन संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम व सहकार्य केले.

# ओबीसीं समाजाचे ९५००० कोटीचं अतोनात नुकसान!– उमेश कोर्राम

मालेगाव:– गेल्या ९० वर्षापासून ओबीसींची वं स्वतंत्र जातीनिहाय जनगणना झालेली नाही जनगणनेत स्वतंत्र कॉलम नसल्यामुळे एकट्या महाराष्ट्रातील ओबीसी समाजाचे तब्बल ९५हजार व कोटी रुपयांचे अतोनात आर्थिक, न सामाजिक आणि राजकीय नुकसान होत आहे सरकार ओबीसी समाजाच्या क न्याय हक्काकडे सतत दुर्लक्ष करत न असून हा अन्याय आता सहन केला . जाणार नाही आगामी जनगणनेत र जातीनिहाय जनगणना आणि ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम दिला , गेला नाही तर संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन खेळण्याचा इशारा मालेगाव रे येथील सावित्रीबाई फुले चौकात , बोलताना ओबीसीं महामोर्चाचे मुख्य संयोजक उमेश कोर्राम यांनी केले.यावेळी ओबीसी अधिकार मंचचे संयोजक खेमेंद्र कटरे,मुकुंद अडेवार,अशोक काकडे,शंकर पाल,युवा कार्यकर्ता गौरव बिसेन आदी मंडल यात्रेतील सहकारीही उपस्थित होते.



ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेसाठी विदर्भातील अकरा जिल्ह्यातून चाललेली मंडल यात्राच्या जंगी स्वागताचे आयोजन बुधवारी (दि.५) रोजी सकाळी १० वाजता मालेगाव शहरातील ओबीसी समर्थकांकडून फटाक्यांच्या आतिषबाजीत, पुष्पगुच्छ पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले. सत्यशोधकी कार्यकर्त्या प्रा. सविता अनिल बळी यांनी कुंकुम तिलक लावून ऊमेश कोर्राम यांचे स्वागत केले. यावेळी प्रामुख्याने माजी नगराध्यक्ष बँक अरुण विश्वनाथ बळी, व्यवस्थापक दिलीप राऊत, अंबिका बँक व्यवस्थापक कैलासराव चोपडे, नगरसेवक योगेश रामचंद्र बळी, युवासेना शहर प्रमुख विकास सुभाष बळी, शिवसेना शहर प्रमुख संतोष बळी (सावकार),अक्षय संजय बळी, अक्षय वसंत बळी, फौजी गणेश भांदुर्गे, ढवळेश्वर फाउंडेशनचे रुपेश गणेश बळी, विजय प्रल्हाद बळी, लखन बळी, स्वानंद बळी, सागर बळी, केशव उर्फ बंडूभाऊ बळी, भगवान बळी, अनिल बाविस्कर, नंदू बळी (वाहक), केशवराव दत्तूजी बळी, बबनराव तांबेकर गुरुजी, काशिनाथ जागृत यांच्यासह अनेक मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती. यावेळी या स्वागत सोहळ्याचे मुख्य संयोजक अनिल बळी यांनी प्रास्ताविक तथा आभार प्रदर्शन केले.

ओबीसी साठी लावलेली क्रिमिलियरची अट रद्द होईल, पदोन्नती आरक्षण मिळेल, केंद्रीय अर्थसंकल्पात दरवर्षी ओवीसींच्या कल्याणासाठी स?द्यस्थितीत फक्त एक टक्का निधी देत आहे, जनगणना झाली तर एससी एसटी प्रमाणे १०० टक्के शिष्यवृत्ती मिळेल, पॉलिटिकल आरक्षण इत्यादी विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

# वन विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढा

गोंदिया:– विदर्भातील वन विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न, वनजमिनीचे पट्टे, वन्यप्राण्यांचा वाढता उपद्रव तसेच विकासकामांतील वन परवानग्यांचे अडथळे तातडीने दूर करून सर्व प्रकरणे कालमर्यादेत निकाली काढावीत, असे स्पष्ट निर्देश राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी यंत्रणेला दिले.

अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील महत्वपूर्ण विषयांवर – आ. राजकुमार बडोले यांच्या पुढाकाराने मंत्रालयात उच्चस्तरीय आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत अर्जुनी–मोरगाव विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. वन परवानग्यांअभावी अनेक वर्षापासून रखडलेल्या झाशीनगर उपसा सिंचन योजनेला तातडीने मंजुरी मिळावी,यासाठी वन विभागातील प्रक्रियात्मक अडचणी दूर करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच निर्वनीकरणाशी संबंधित प्रश्न निकाली काढून इटियाडोह प्रकल्प परिसरातील विकासकामांनाही गती देण्यावर भर देण्यात आला.

बैठकीत नवेगावबांध पर्यटन संकुलातील झुडपी जंगलाचा भागफ राखीव वन म्हणून घोषित होऊ नये, तसेच पर्यटन विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून पर्यटनाला चालना देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. यासोबतच सडक अर्जुनी तालुक्यातील १०८ पैकी १०७ गावे इको सेन्सेटिक झोनमध्ये बाधित झाल्याने निर्माण झालेल्या अडचणी, वनजमिनींच्या पड्यांचे वाटप, तसेच तिबेटी कॅम्प पुनर्वसन धोरण–२०१४ आणि भाडेपट्टा करारात्तदर्भातील विषयही बैठकीत गांभीर्याने मांडण्यात आले. व्याघ्र प्रकल्प परिसरातील शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान, तसेच वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांमुळे होणारी जीवितहानी रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याचे निर्देश वनमंत्र्यांनी दिले. पीक नुकसानीच्या भरपाईच्या रकमेत वाढ करण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती बैठकीनंतर देण्यात

आली. या महत्त्वपूर्ण बैठकीस अर्जुनी मोरगावचे आमदार तथा माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले, साकोलीचे आमदार नाना पटोले, आमदार राजूभाऊ कारेमोरे, वन विभागाचे



वरिष्ठ अधिकारी, संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

झाशीनगर उपसा सिंचन योजनेच्या वन परवानग्या तातडीने मार्गी लावणार. नवेगावबांध पर्यटन विकासासाठी आवश्यक निधी व प्रशासकीय प्रक्रिया गतिमान करणार.इको–सेन्सेटिव्ह झोनमुळे निर्माण झालेल्या अडचणींवर तोडगा काढण्याचे निर्देश. वनजमिनींच्या पट्टयांचे प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यावर भर. वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या पीक नुकसानीच्या भरपाईत वाढ करण्याबाबत सकारात्मक भूमिका. विविध विभागांमध्ये समन्वय साधून सर्व प्रलंबित विकासकामे कालमर्यादेत पूर्ण करण्याचे आदेश.

## जुगार खेळणाऱ्या गोंदियाच्या १३ जणांसह १४ जणांना अटक

बालाघाट:– ग्रामीण पोलीस ठाणे (नवेगाव) अंतर्गत येणाऱ्या खुरसोडी गावात पत्र्याच्या शेडमध्ये जुगार खेळणाऱ्या १४ जणांना पोलिसांनी रंगेहात पकडले. यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील १३ जुर्गा?यांचा समावेश आहे. पोलिसांनी जुगाराच्या अड्ड्यावरून ३ कारसह एकूण ३८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.९ ऑगस्ट रोजी ग्रामीण पोलिसांना माहिती मिळाली होती की, खुरसोडी येथील ओमप्रकाश नागपुरे याच्या गोदामातील पत्र्याच्या शेडमध्ये काही जण मोठ्या प्रमाणावर जुगार खेळत आहेत. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने घटनास्थळी छापा टाकून १४ जणांना जुगार खेळताना ताब्यात घेतले.

कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून १ लाख ५० हजार २०० रुपये रोख, ताशचे पत्ते, २ लाख ५० हजार रुपये किमतीचे १४ अँड्रॉइड मोबाईल आणि तब्बल ३४ लाख रुपये किमतीच्या ३ चारचाकी गाड्या (क्रमांक चक ३५ अथ ६०८०, चक ३५ अऋ ६६९७ आणि चक ३५ अथ ९१८३) असा एकूण ३८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी गोंदिया जिल्ह्यातील चारगाव येथील ओमप्रकाश नागपुरे (४०), अर्जुनी येथील शिवकुमार खैरवार (४७), नागरा येथील नरेश नागरिकर (५४), कन्हारटोला येथील आदित्य तुरकर (२१), नागरा येथील भरत लिल्हारे (४६), पांढराबोडी येथील कमलेश नागपुरे (३६), मुरपार येथील मंगल मस्करे (४४), चारगाव येथील सुधीर रोडगे (३३), रणजीत बरेले (४८), विशाल मेंढे (३३), पंकज नागपुरे (३०), खेमेंद्र बिरनवार (३९), सावरीटोला येथील जगदीश प्रसाद तिवडे (४०) आणि बालाघाट जिल्ह्यातील खुरसोडी येथील ओमप्रकाश दशहरे (४५) यांच्याविरुद्ध नवेगाव (ग्रामीण) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## प्राथमिक आरोग्य केंद्र सोनी येथे आग प्रतिबंधात्मक प्रशिक्षण



गोरेगाव:– आरोग्य संस्था व रुग्णालयांमध्ये अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांची सुरक्षितता आणि त्वरित प्रतिसाद अत्यंत महत्त्वाचा असतो. याच पार्श्वभूमीवर ५ ऑगस्ट रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र सोनी येथे अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी "आग प्रतिबंधात्मक व आपत्कालीन व्यवस्थापन' प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. वैद्यकीय अधिकारी डॉ. देव चांदेवार यांच्या संकल्पनेतून हे प्रात्यक्षिक प्रशिक्षण पार पडले.

प्रशिक्षणादरम्यान डॉ. चांदेवार यांनी स्पष्ट केले की, शॉर्ट सर्किट किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणांमुळे आग लागल्यास "रेस' (RACE) पद्धत (बचाव, सावध करणे, आग रोखणे व२६ विझवणे) आणि अग्निशामक यंत्र चालवण्यासाठी "पास' (PASS) तंत्रज्ञानाची माहिती प्रत्येक कर्मचारी व नागरिकाला असणे गरजेचे आहे.

यावेळी कर्मचाऱ्यांना लाकूड, रसायने व इलेक्ट्रिकल उपकरणांमुळे लागणाऱ्या आगीचे विविध प्रकार (Class A, B, C d Electrical F$ire) आणि त्यानुसार वापरल्या जाणाऱ्या अइउ, उज२ व ऋेरा अग्निशामक यंत्रांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. तसेच मॉक ड्रिल, आपत्कालीन मार्ग मोकळा ठेवणे आणि प्रेशर गेज तपासणीबाबत महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या.

या प्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी व सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मादी बिबट्या अखेर वन विभागाच्या ताब्यात

तिरोडा:–तालुक्यातील सोनेंगाव–बिबीटोला परिसरात मागील एक–दोन आठवड्यांपासून बिबट्याच्या सततच्या वावरामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. बिबट्याच्या हालचाली तसेच हल्ल्याच्या घटनांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये दहशत पसरली होती.

ग्रामस्थांची वाढती चिंता लक्षात घेऊन वन विभागाच्या पथकाने बिबट्याच्या हालचालींवर सातत्याने नजर ठेवली. अखेर वन विभागाच्या अथक प्रयत्नांना यश आले असून दहशत निर्माण करणाऱ्या मादी बिबट्याला सुरक्षितपणे पकडण्यात आले.

बिबट्या पकडल्याची माहिती मिळताच सोनेंगाव–बिबीटोला तसेच परिसरातील ग्रामस्थांनी सुटकेचा श्वास घेतला. मागील अनेक दिवसांपासून बिबट्याच्या वावरामुळे शेतात ये–जा करणे, शेतीची कामे करणे तसेच दैनंदिन व्यवहार करताना नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. वन विभागाच्या पथकाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सतर्कता व तत्परतेने केलेल्या कारवाईमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला. बिबट्याला पकडण्यासाठी वन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांचे ग्रामस्थांनी कौतुक केले. वन विभागाच्या या यशस्वी कारवाईमुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून ग्रामस्थांनी वन विभागाचे आभार मानले आहेत

## बनावट स्वाक्षरीने एलआयसीचे तब्बल २१ लाख रुपये हडपले

गोंदिया :– बँक कर्मचाऱ्याला हाताशी धरून बनावट स्वाक्षरीच्या आधारे बँकेत खाते उघडून बाप–लेकाच्या जोडीने एलआयसीची रक्कम परस्पर काढून घेतल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. शहर पोलिस ठाण्यांतर्गत सिंधी कॉलनीतील फेब्रुवारी २०२५ मधील हे प्रकरण असल्याचे समजते. या प्रकरणी गंगाराम ऊर्फ गुड्डू तन्तुमल कारडा (५२) आणि अमन गंगाराम कारडा (दोघे, रा. सिंधी कॉलनी, झुलेलाल वॉर्ड) यांच्याविरुद्ध आदेशावरून फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सुरेश अरतमल कारडा (वय ६६, रा. सिंधी कॉलनी) शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, सन २००३ मध्ये सुरेश कारडा यांनी स्वतःच्या व पत्नी मीना कारडा (५६) यांच्या नावाने एलआयसीच्या पॉलिसी घेतल्या होत्या. पॉलिसीची मुदत पूर्ण झाल्यानंतर एलआयसीकडून रक्कम मिळणे अपेक्षित होते.

मात्र, त्यावेळी सुरेश हे सतना (मध्य प्रदेश) येथे असल्याने येथील त्यांच्या घरी आलेले एलआयसीचे पत्र त्यांचा पुतण्या गंगाराम कारडा याने घेतले. गंगाराम याने त्याचा मुलगा अमन याला सोबत घेऊन सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शाखेत सुरेश व त्यांच्या पत्नीच्या नावाने खाते उघडले.

सुरेश यांना आयकर विवरणातील टीडीएसनंतर एलआयसीची रक्कम परत आल्याचे समजल्यानंतर त्यांनी २५ फ ेब्रुवारी २०२५ रोजी आपल्या तीन जावयांसह सेंट्रल बँक ऑफ इंडियात जाऊन खात्यांची माहिती मागितली. त्यानंतर आरटीआयअंतर्गत मिळालेल्या म ाहितीत त्यांच्या नावाने बँक खाती उघडण्यात आल्याचे समोर आले. एवढेच नव्हे, तर या खात्यांमधून सेल्फ चेकद्वारे वेगवेगळ्या दिवशी पैसे काढण्यात आल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

### आयकर विवरणातून मिळाला धागा

सुरेश कारडा आयकर विवरण भरत असताना टीडीएसनंतर एलआयसीची रक्कम परत आल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर चौकशी केली असता त्यांच्या व पत्नीच्या नावाने सेंट्रल बँक ऑफ इंडियात खाते उघडल्याची माहिती मिळाल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले. माहिती मिळताच त्यांनी न्यायालयात धाव घेतली. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १७५ (३) अन्वये एफआयआर नोंदविण्याची मागणी करण्यात आली. शुक्रवारी (दि. ७) न्यायालयाने एफआयआर नोंदवून तपास करण्याचे आदेश शहर पोलिसांना दिले.

### २१ लाखांहून अधिक रकमेचा व्यवहार

सुरेश व त्यांच्या पत्नीच्या बनावट स्वाक्षऱ्या करून दोघा आरोपींनी खाते उघडले. तसेच सुरेश यांच्या नावावरील खात्यातून एलआयसीचे १३ लाख ४५ हजार ४९४ रुपये, तर त्यांची पत्नी मीना यांच्या नावावरील खात्यातून सात लाख ९७ हजार ६१३ रुपये असे एकूण २१ लाख ४३ हजार १०७ रुपये काढून सुरेश व त्यांच्या पत्नीची फसवणूक करण्यात आली आहे.

# राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्काराने कमलेश बिसेन सन्मानित

गोंदिया :– महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत सन २०२४–२५ या वर्षासाठी जाहीर करण्यात आलेल्या राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कारासाठी ग्रामपंचायत रायपूर, पंचायत समिती गोंदिया येथे कार्यरत ग्रामपंचायत अधिकारी श्री. कमलेश वजीर बिसेन यांची निवड झाली आहे. त्यांच्या प्रशासकीय कार्यक्षमतेबरोबरच सामाजिक बांधिलकी, कर्मचारी चळवळीतील योगदान, सहकार क्षेत्रातील नेतृत्व आणि ग्रामीण विकासासाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची ही राज्यस्तरीय पावती मानली जात आहे.

श्री. कमलेश बिसेन हे गेल्या अनेक वर्षांपासून कर्मचारी चळवळीतील सक्रिय नेतृत्व म्हणून ओळखले जातात. कर्मचारी हिताच्या विविध प्रश्नांवर त्यांनी सातत्याने संघर्ष करत सिंहाचा वाटा उचलला आहे. ते ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाचे गोंदिया जिल्हाध्यक्ष असून जिल्हा परिषद व मध्यवर्ती सरकारी कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. कर्मचारी, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय साधून प्रश्न मार्गी लावण्याचे त्यांचे कार्य उल्लेखनीय मानले जाते.

याशिवाय ते जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी सचिव म्हणून जबाबदारी सांभाळत असून त्यांच्या कार्यकाळात सभासदांच्या हितासाठी अनेक कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या आहेत. पतसंस्थेच्या माध्यमातून आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि सभासदाभिमुख निर्णयांमुळे संस्थेवर सभासदांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.



श्री. बिसेन हे ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष असून त्यांच्या पुढाकारातून या पतसंस्थेची स्थापना झाली. संस्थेच्या माध्यमातून ग्रामपंचायत अधिकारी व त्यांच्या कुटुंबियांच्या आर्थिक आणि सामाजिक सुरक्षिततेसाठी अनेक उपक्रम सुरू करण्यात आले. आरोग्य संजीवनी योजना, कुटुंब कल्याण निधी योजना तसेच इतर विविध सभासद कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून शेकडो सभासदांना आर्थिक आधार, सामाजिक सुरक्षा आणि संकटाच्या काळात मदतीचा हात देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे.

ग्रामीण विकास हा केवळ शासकीय जबाबदारी न मानता लोकसहभागातून विकास घडवून आणण्याचा त्यांचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. जिल्हा परिषदेमधील पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांच्यात समन्वयाचे दुवा म्हणून ते सातत्याने कार्यरत असून शासनाच्या योजना प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचाव्यात, गावांचा सर्वांगीण विकास व्हावा आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख व्हावे यासाठी त्यांनी अनेक सकारात्मक उपक्रम राबविले आहेत.

सामाजिक कार्य, सहकार क्षेत्रातील नेतृत्व, कर्मचारी चळवळीतील योगदान आणि ग्रामीण विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांची राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कारासाठी निवड केली आहे. या यशाबद्दल लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, विविध सामाजिक संघटना आणि सर्व स्तरातील नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून गोंदिया जिल्ह्यासाठी हा अभिमानाचा क्षण मानला जात आहे.

## विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ; निकृष्ट पोषण आहार पुरवठा

गोंदिया:– शासकीय शाळांची पटसंख्या कमी होवू नये तसेच विद्यार्थ्यांना शाळेची ओढ लागावी, या उद्देशाने मध्यान्ह पोषण आहार दिला जातो. मात्र पोषण आहाराच्या नावाखाली निकृष्ट अन्नधान्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ खेळला जात आहे, असा आरोप माजी आमदार दिलीप बन्सोड यांनी केला आहे. या संदर्भात जि. प. चे मुकाअ दोन्तुला यांना निवेदन देवून पुरवठा परत करावा व कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी, अशा मागणी करण्यात आली आहे. अन्यथा आंदोलन करू, असा इशाराही त्यांनी दिला आहे.



जिल्ह्यातील शासकीय शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजनाकरीता पुरवठा करण्यात येणारे अन्नधान्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे. जे अन्नधान्य पशुही खाणार नाही, अन्नधान्य विद्यार्थ्यांसाठी पुरवठा केले जात आहे. शाळांमध्ये तांदूळ चना, तुरदाळ, मटकी, मुंग दाळ, वटाणा, चवळीदाणा असे असे अन्नधान्य पुरविण्यात आले. पण ही अन्नधान्य किड लागलेली व निकृष्ट दर्जाचे आहे. विशेष म्हणजे, मिरची पुडच्या नावाखाली लाल रंगाचा भुसा पाठविण्यात आला आहे. जेणे करून शालेय प्रशासन देखील पुरविण्यात आलेली मिरची पुड न वापरला पर्यायाने बाजारातून खरेदी करून आणलेली मिरची पुड वापरली जात आहे.

एंकदरीत या निकृष्ट आहारातून जिल्ह्यातील विद्यार्थ्यांशी खेळ केला जात आहे. असा आरोप आयोजित पत्रपरिषदेत्त्या माध्यमातून माजी आमदार दिलीप बन्सोड यांनी केला आहे. या संदर्भात जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षण विभागाला निवेदन देण्यात आले आहे.

सदर निकृष्ट दर्जाचे पोषण आहार परत न्यावे तसेच पुरवठा करणाऱ्या हरी राईस मिल या कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.यावेळी त्यांच्यासोबत वंदना काळे, योगेश अग्रवाल, लोधी समाज संघटनेचे शिव नागपुरे, उपसभापती पप्पु पटले आदि उपस्थित होते.